आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर
वाचा एका क्लिकवर
www.elaturprabhat.in




दैनिक
# लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com
मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,
RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ९ वे ● अंक ४५ वा ● मंगळवार दि. ०५ ऑगस्ट २०२५ ● किंमत २ रुपया ● पाने ४ ●




## गेट वे ऑफ इंडिया,गिरगाव चौपाटी आणि नरिमन पॉईंट येथे 'पर्यटन सुरक्षा दल' नेमणार - मंत्री शंभूराज देसाई

मुंबई: पर्यटनस्थळांच्या ठिकाणी 'सुरक्षा



दल' हा पर्यटन विभागाकडून नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येत आहे. मुंबईतील पर्यटनस्थळावरती सुरक्षेच्या दृष्टीने 'गेट वे ऑफ इंडिया' आणि 'गिरगाव चौपाटी', नरिमन पॉईंट येथे 'पर्यटन सुरक्षा दल' नेमण्याची कार्यवाही करा, असे निर्देश पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी दिले.

यासंदर्भात मंत्री देसाई यांच्या मेघदूत या शासकीय निवासस्थानी बैठक झाली. बैठकीस पर्यटन विभागाचे प्रधान सचिव अतुल पाटणे, पयटन संचालक डॉ.बी.एन.पाटील, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक चंद्रशेखर जयस्वाल यासह इतर अधिकारी उपस्थित होते.

मंत्री देसाई म्हणाले, सध्या महाबळेश्र्वर येथे पर्यटकांच्या सुरक्षेसाठी 'पर्यटन सुरक्षा दल' हा उपक्रम सुरू आहे. टप्प्या-टप्प्याने या उपक्रमाची राज्यात व्याप्ती वाढविण्यात येत आहे. मुंबईत पर्यटक मोठ्या प्रमाणात भेट देत असून पर्यटकांना सुरक्षा दिल्यास सुरक्षित पर्यटन होऊन पर्यटन वाढीला चालना मिळेल. पर्यटकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा आहे हे लक्षात घेऊन गेट वे ऑफ इंडिया, गिरगाव चौपाटी, नरिमन पॉईंट येथे 'पर्यटक सुरक्षा दल' नेमण्यात यावेत. राज्यात येणाऱ्या पर्यटकांच्या सुरक्षेसाठी पर्यटन सुरक्षा दलासाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने तातडीने कार्यवाही करावी, अशा सूचना मंत्री देसाई यांनी यावेळी दिल्या.

## बिहारमधील विशेष सखोल पुनरीक्षण उपक्रमातील मतदार यादीवरील दावे-हरकतींचा अहवाल प्रसिद्ध

मुंबई, : भारत निवडणूक आयोगाने १ ते ४ ऑगस्ट या काळातील बिहार येथे झालेल्या विशेष सखोल पुनरीक्षण (ڂखठ २०२५)



उपक्रम अंतर्गत मिळालेल्या दावे-हरकतींचा अहवाल प्रसिद्ध केला आहे.

राजकीय पक्षांकडून मसुदा मतदार यादीबाबत आलेल्या दावे-हरकतींत एकूण १,६०,८१३ अर्ज प्राप्त झाले आहेत. यामध्ये राष्ट्रीय पक्षांपैकी भाजपकडून ५३,३३८, कॉंग्रेसकडून १७,५४९, बसपाकडून ७४, आम आदमी पक्षाकडून १, सीपीआय (एम) कडून ८९९ आणि नॅशनल पीपल्स पार्टीकडून ७ अर्ज आले.

राज्यस्तरीय पक्षांमध्ये राष्ट्रीय जनता दल (राजद) कडून सर्वाधिक ४७,५०६ अर्ज, जनता दल (यू) कडून ३६,५५०, सीपीआय (एम-एल) (लिबरेशन) कडून १,४९६, लोक जनशक्ती पार्टी (राम विलास) कडून १,२१०, राष्ट्रीय लोक जनशक्ती पक्षाकडून १,९१३ आणि राष्ट्रीय लोक समता पक्षाकडून २७० अर्ज नोंदवले गेले.

याशिवाय, मतदारांकडून थेट सादर झालेल्या दावे-हरकतींची संख्या १,९२७ आहे, तर १८ वर्षे पूर्ण केलेल्या नव्या मतदारांकडून (फॉर्म ६ आणि घोषणा) १०,९७७ अर्ज प्राप्त झाले आहेत. नियमांनुसार, हे सर्व अर्ज संबंधित ईआरओ/एईआरओ (एठज/-एठज) यांच्याकडून सात दिवसांनंतर निकाली काढले जातील. तसेच, एसआयआर (ڂखठ) आदेशांनुसार १ ऑगस्ट २०२५ रोजी प्रसिद्ध झालेल्या मसुदा यादीतील कोणतेही नाव योग्य तपासणी आणि संधी दिल्यानंतरच वगळता येणार असल्याचे भारत निवडणूक आयोगाने एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# अधिकाऱ्यांनी आठवड्यातून एक दिवस गाव भेट दौरा करावा - पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

नागपूर, : जिल्ह्यातील गावागावातील पांदण रस्ते, पाण्याचे प्रश्र्न समस्या सोडविण्यास प्राधान्य आहे. सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी संबंधित प्रत्येक अधिकाऱ्यांनी गावात गावभेट देण्याची गरज आहे. गाव भेट दिल्यास गावातील समस्या समजून घेण्यास मदत होईल. आठवड्यातून एक दिवस अधिकाऱ्यांनी संबंधित गावात भेटी देण्याची गरज आहे. स्थानिक नागरिकांचे प्रश्र्न समजून घेत त्या सोडविण्याचा प्रयत्न करावा, असे महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज येथे सांगितले.

पालकमंत्री श्री. बावनकुळे यांनी आज कोदामेंढी आणि खात या मौदा तालुक्यातील गावांना भेटी दिल्या. त्यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी माजी आमदार टेकचंद सावरकर यांच्यासह स्थानिक लोकप्रतिनिधी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सर्वसामान्यांच्या वेळ मिळत आहे तशा तक्रारी समजून घेत आहे. सर्वसामान्य नागरिकांच्या विकासकामांसाठी अनुकूल



लागणारे निर्णय घेण्याचा आमचा प्रयत्न आहे. आपल्या क्षेत्रासाठी काय नवनिर्माण होत आहे याची अपेक्षा नागरिकांना असते. त्या अपेक्षा पूर्ण करण्याचा प्रयत्न आहे. त्यामुळे अडचणी व समस्या समजून घेण्यासाठी प्रत्येक आठवड्याला गाव दौरा करायचे ठरविले आहे. गाव भेटीत सरपंच आणि जनतेने दिलेले निवेदन घेऊन त्यावर उचित कार्यवाही होणार असल्याचे पालकमंत्री श्री. बावनकुळे यावेळी म्हणाले.

शेतकऱ्यांसाठी पादंण रस्ते हा जिव्हाळ्याचा विषय असतो पुढील पाच वर्षात पानंद रस्ते मोठ्या प्रमाणात करून शेतकऱ्यांचा हा जिव्हाळ्याचा विषय मार्गी लावण्याचा प्रयत्न आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात सर्वसामान्यांच्या पाठीशी उभे राहत भक्कमपणे काम सुरू असल्याचे पालकमंत्री श्री बावनकुळे यावेळी म्हणाले.

दरम्यान, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्थानिक नागरिकांच्या तक्रारी, निवेदने स्वीकारली व संबंधितांना आवश्यक ते निर्देश दिले.

मौदा क्रीडा संकुलातील विविध विकासकामांचे भूमिपूजन

पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते मौदा क्रीडा संकुलातील विविध विकास कामांचे भूमिपूजन करण्यात आले. यात २०० मीटर सिंथेटिक ट्रॅक, फुट्सल ग्राउंड व जिम सह इतर विकास कामांचा समावेश आहे. यावेळी माजी आमदार टेकचंद सावरकर,जिल्हा क्रीडा अधिकारी पल्लवी धात्रक, क्रीडा अधिकारी माया दुबळे यांच्यासह क्रीडा विभागाचे वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# अलमट्टी धरण आणि हिप्परगी बंधाऱ्यामधील अनियमितता राष्ट्रीय बांध सुरक्षा प्राधिकरणाकडून तपासली जाईल

नवी दिल्ली, : कर्नाटक राज्यातील अलमट्टी धरण आणि हिप्परगी बंधाऱ्यामधील बांधकामबाबतची अनियमितता राष्ट्रीय बांध सुरक्षा प्राधिकरणाकडून (छर्रीलेपरश्र उर्रा डरषशींू -र्रीहेळीूं) तपासली जाईल, अशी माहिती राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी आज शिष्टमंडळासह केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांची भेट घेतल्यानंतर माध्यमांना दिली.

श्रमशक्ती भवन येथे आज झालेल्या बैठकीत राज्याचे जलसंपदा मंत्री श्री. विखे पाटील यांच्यासह कोल्हापूरचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर आणि सहपालकमंत्री माधुरी मिसाळ, कोल्हापूर, सांगली जिल्ह्यातील खासदार आणि आमदार शिष्टमंडळात सहभागी होते. सेंट्रल वॉटर बोर्ड कमिशनचे अध्यक्ष, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाच्या प्रधान सचिव देबाश्री मुखर्जी बैठकीत उपस्थित होत्या.

कर्नाटक राज्यशासनाने अलमट्टी धरणाची पूर्ण साठवण पातळी (ऋठङ) ला ५१९.६० मीटरवरून ५२४.२५६ मीटर वाढवण्याचा प्रस्ताव सादर केला असून, मात्र सध्या असणाऱ्या धरणाच्या उंचीमुळे वर्ष २०१९



आणि २०२१ मध्ये आलेल्या अतिवृष्टीमुळे या परिसरात मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. भविष्यातही अतिवृष्टी झाल्यास या धरणाच्या बॅक वॉटरमुळे अधिक मोठे नुकसान होऊ शकते. भविष्यात होणारी आपत्ती टाळण्यासाठी आज राज्याच्या जलसंपदा मंत्री यांच्या अध्यक्षतेत शिष्टमंडळने केंद्रीय मंत्री यांची भेट घेतली.

झालेल्या बैठकीत सविस्तर चर्चेअंती केंद्रीय मंत्री श्री. पाटील यांनी राष्ट्रीय बांध सुरक्षा प्राधिकरण यांच्याकडून कर्नाटक सरकारने अलमट्टी धरन बाधतांना केलेल्या अनियमिततेची तपासणीचे निर्देश दिले.

मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी आतापर्यंत राज्य शासनाच्यावतीने झालेल्या अभ्यासानुसार अलमट्टी धरणमुळे कृष्णा नदी आणि तिच्या उपनद्यांमध्ये पाणी तुंबणे वाढले आहे, त्यामुळे नदीच्या वाहून नेण्याच्या क्षमतेवर परिणाम झाला आहे. सांगली आणि कोल्हापूर येथे पूरच्या पाण्याचा ओसरण्याचा वेग कमी झाला आहे. यामुळे लगतच्या कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यांमध्ये नेहमीसाठी पूर परिस्थिती निर्माण झाली असून या परिसरातील जीवनमान बिघडले आहे. शेतीवर तसेच नागरी जीवनावर याचा विपरीत परिणाम होत आहे. त्यामुळे केंद्र सरकारने यामध्ये हस्तक्षेप करावा, अशी मागणी शिष्टमंडळाच्यावतीने करण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कर्नाटक सरकारला अलमट्टी धरणाच्या उंची वाढीबाबत तीव्र आक्षेप नोंदवले आहेत.

झालेल्या बैठकीत शिष्टमंडळामध्ये सर्वश्री खासदार श्री शाहू शहाजी छत्रपती, विशाल पाटील, धैर्यशील माने, धनंजय महाडिक, सर्वश्री आमदार सतेज पाटील, अरुण लाड, डॉ. विश्र्वजीत कदम, राहुल आवाडे, राजेंद्र पाटील येड्रावकर, डॉ. अशोक कुमार माने, सदाभाऊ खोत, सत्यजित देशमुख, सुधाकर गाडगीळ आदी उपस्थित होते.

## अंगदान जीवन संजीवनी अभियान अवयव दान अंतर्गत भोकर येथे जनजागृती

भोकर / प्रतिनिधी/ दिनांक ३ ऑगस्ट ते १४ ऑगस्ट या कालावधीत अंगदान जीवन संजीवनी अभियान राबविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने दि. ०४ ऑगस्ट २०२५ रोजी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय पेरके , निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. राजाभाऊ बुट्टे , नोडल अधिकारी डॉ. हनुमंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व ग्रामीण रुग्णालय भोकर वैद्यकीय अधिक्षक डॉ. प्रताप चव्हाण यांच्या निरीक्षणाखाली ग्रामीण रुग्णालय भोकर येथे अंगदान जीवन संजीवनी अभियान कार्यक्रम अंतर्गत जनजागृती करण्यात आली. अंगदान अवयव तसेच पोस्टर आणि क्यूआर कोड स्कॅनरचे




विमोचन करण्यात आले. सर्व शासकीय कार्यालय महाविद्यालय येथे अंगदान जनजागृती साठी क्यूआर कोड स्कॅनरद्वारे अंगदान ऑनलाईन फॉर्म भरण्याचे नियोजन करण्यात आले. तसेच रुग्णालयातील सर्व वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांचे फॉर्म भरण्यात आले. यावेळी वैद्यकीय अधिक्षक डॉ. प्रताप चव्हाण, वैद्यकीय अधिकारी,सर्व अधिकारी व कर्मचारी आदि उपस्थित होते.

## लोकशाही दिनी नागरिकांच्या तक्रारींचे निवारण

लातूर/ प्रतिनिधी: ऑगस्ट महिन्यातील पहिल्या सोमवार निमित्त दि. ४ ऑगस्ट रोजी महानगरपालिकेत आयोजित लोकशाही दिनी ८ तक्रारींचे निवारण करण्यात आले. यापैकी ६ तक्रारी वैयक्तिक स्वरूपाच्या तर २ सार्वजनिक होत्या.



मनपा आयुक्त श्रीमती मानसी, उपायुक्त डॉ.पंजाबराव खानसोळे, मुख्य लेखाधिकारी रावसाहेब कोलगणे, नागरी सुविधा केंद्र व लोकशाही दिन प्रमुख रंदावनी पवार यांच्यासह सर्व विभाग प्रमुखांची यावेळी उपस्थिती होती.

लोकशाही दिनी शेख सुलतान शमशोद्दीन, श्रीमती काशीबाई कोरे, माधव सूर्यवंशी, रोहिदास वाघचौरे, संतोष चंद्रे, रोहित शेटे, आकाश बाभळे व सुलेमान सय्यद यांनी तक्रारी अर्ज दाखल केले होते. क्षेत्रीय कार्यालय सी, मुख्य लेखा परीक्षक विभाग, क्षेत्रीय कार्यालय ए, पर्यावरण विभाग, क्षेत्रीय कार्यालय डी, अतिक्रमण विभाग, ई प्रशासन विभाग, विवाह नोंदणी व सामान्य प्रशासन विभागाशी संबंधित असणारे हे तक्रारी अर्ज संबंधित विभागाकडे वर्ग करण्यात आले. अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत तक्रारदारांचे म्हणणे ऐकून घेत त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्याचे आदेश मनपा आयुक्त श्रीमती मानसी यांनी दिले.

दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी होणाऱ्या लोकशाही दिनात नागरिकांकडून आलेल्या वैयक्तिक तक्रारीचे निराकरण केले जाते. नागरिकांनी आपल्या तक्रारी मांडून त्याची सोडवणूक करून घ्यावे, असे आवाहन आयुक्त श्रीमती मानसी यांनी केले आहे.

## वर्षोनुवर्षे प्रकल्प चालवू नका; तीन वर्षांत प्रकल्प पूर्ण व्हायला हवेत

मुंबई, : पायाभूत सुविधांचे प्रकल्प हाती घेतल्यानंतर ते



वेळेत पूर्ण व्हायला हवेत. त्यामुळे पायाभूत सुविधांचे प्रकल्प वर्षानुवर्षे चालू न राहता ते प्रकल्प हाती घेतल्यानंतर तीन वर्षांत पूर्णत्वास यायला हवेत, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी मुख्यमंत्री वॉररुमधील विविध पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या प्रगतीचा आढावा घेतला. मंत्रालयातील मंत्रिमंडळ सभागृहात झालेल्या या बैठकीस मुख्य सचिव राजेश कुमार, मुख्यमंत्र्यांचे मुख्य आर्थिक सल्लागार प्रवीणसिंह परदेशी यांच्यासह विविध विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव व सचिव उपस्थित होते. तर दूरदृश्यप्रणालीद्वारे विविध विभागांचे विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

वॉररुमच्या आजच्या तिसऱ्या बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस यांनी ३० प्रकल्पांच्या सद्यःस्थितीचा आढावा घेतला. यापूर्वी झालेल्या दोन बैठकांमध्ये एकूण ३३ प्रकल्पांचा आढावा घेण्यात आला होता. त्यावेळी सुमारे १३५ मुद्यांवर चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले. या निर्णयांवरील अंमलबजावणीची माहिती यावेळी देण्यात आली.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, आपल्याकडे तंत्रज्ञान अद्ययावत आहे. त्यामुळे कमी कालावधीत प्रकल्प पूर्ण व्हायला हवेत. मुंबईसह राज्यातील सर्व मेट्रो प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासाठी ज्या अडचणी येतात त्यांचे निराकरण वेळेत करावे. तसेच मेट्रो प्रकल्पाच्या शेवटच्या स्थानकाजवळ गृहनिर्माण प्रकल्प उभारावेत. तसेच मेट्रो प्रकल्प वेळेत मार्गी लागण्यासाठी कुशल यंत्रणा तयार करणे आवश्यक आहे. मेट्रो प्रकल्प तसेच इतर सुविधा प्रकल्पांसाठी लागणारा निधी तातडीने वितरित करण्याची कार्यवाही करण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

पायाभूत सुविधा प्रकल्प राबविताना तो वेळेत पूर्ण होईल, याकडे सर्वांनी लक्ष द्यायला हवे. प्रत्येकाचे स्वतंत्र डॅशबोर्ड न करता फक्त सीएम डॅशबोर्डवरच प्रत्येक प्रकल्पाची सद्यःस्थिती नोंदविली गेली पाहिजे. प्रकल्पासंबंधित सर्व गोष्टी या डॅशबोर्डवर वेळोवेळी अद्ययावत करण्यात याव्यात, तसेच प्रकल्पातील अडचणी सोडविण्यासाठी वॉररुम आढावा बैठकीत घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी पुढील बैठकीपूर्वी पूर्ण करण्यात यावी. आवश्यक अशा बाबींसाठी मंत्रिमंडळ बैठकीत विषय आणून ते विषय पूर्णत्वास आणायला हवेत.

आढावा बैठकीतील निर्णयानंतरही काही अडचण आल्यास वॉररुमला कळविण्यात यावे, जेणेकरून त्या अडचणी तातडीने सोडविता येतील. वॉररुमधील प्रकल्पांची तसेच निर्णयांची अंमलबजावणी गांभीर्याने करावी, असे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिले.

यावेळी वरळी येथील बीडीडी चाळीतील रहिवाशांना लवकरच सदनिकांचे वाटप करता येईल. तसेच नायगाव व एन.एम.जोशी मार्ग चाळीतील रहिवाशांना ठरलेल्या वेळेत सदनिका देण्याची कार्यवाही करण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

यावेळी बीडीडी चाळ, मुंबईतील मेट्रो लाईन ४ (वडाळा ते कासारवडवली), मेट्रो लाईन ५ (ठाणे-भिवंडी-कल्याण), मुंबई मेट्रो ६ (स्वामी समर्थनगर-विक्रोळी), मेट्रो लाईन २ बी (डीएन नगर ते मंडाळे), मुंबई मेट्रो ७ ए (अंधेरी-छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ टर्मिनल २), मुंबई मेट्रो लाईन ९ (दहिसर (पू) ते मिरा भाईंदर), ऑरेंज गेट ते मरिन ड्राईव्ह टनेल प्रकल्प, बोरिवली ते ठाणे जोड बोगदा प्रकल्प, उत्तन-विरार सी लिंक, शिवडी-वरळी ईलेव्हेटेड कॉरिडॉर, पुणे मेट्रो, दहिसर ते भाईंदर लिंक रोड, गोरेगाव मागाठाणे डीपी रोड, गोरेगाव-मुलुंड लिंक रोड आणि उत्तर सागरी किनारा मार्ग, विरार अलिबाग मल्टिमोडल कॉरिडॉर, धारावी पुनर्विकास प्रकल्प, जालना नांदेड महामार्ग, पुणे रिंगरोड, बांद्रा वर्सोवा सी लिंक, छत्रपती संभाजीनगर शहर पाणी पुरवठा प्रकल्प, कुडूस आरे कनेटिव्हिटी, कुडुस बाभळेश्र्वर वीज जोडणी प्रकल्प, शिक्रापूर बाभळेश्र्वर विद्युत प्रकल्प, वाढवण बंदर प्रकल्प आदी प्रकल्पांचा यावेळी आढावा घेण्यात आला.

मुख्यमंत्री कार्यालयाच्या प्रधान सचिव अश्र्विनी भिडे यांनी सादरीकरणाद्वारे वॉररुम प्रकल्पांची माहिती दिली.

## जेएसपीएम लातूर शिक्षण संस्थेच्या जेएसपीएम कॉलेज ऑफ इंजिनियरींगच्या पहिल्याच फेरीत ७० टक्के प्रवेशा साठी विद्यार्थ्यांनी दर्शवली पसंती

असून यामध्ये सिव्हिल इंजिनियरींग, कॉम्प्युटर इंजिनियरींग, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनियरींग व आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड मशिन लर्निंग या शाखा सुरू करण्यात आल्या आहेत. इंजिनियरींग कॉलेजचे हे पहिले वर्ष असले तरी पहिल्याच फेरीमध्ये विद्यार्थी व पालकांनी प्रवेश क्षमतेच्या ७० टक्के जागासाठी पसंती दर्शविली आहे.

तसेच सन २०13 साली स्थापन करण्यात आलेल्या स्वामी विवेकानंद पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये सिव्हिल इंजिनिअरिंग, कॉम्प्युटर इंजीनियरिंग, इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, इलेक्ट्रिकल इंजीनियरिंग, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजीनियरिंग, मेकॅनिकल इंजिनिअरिंग व आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड मशीन लर्निंग या सात शाखा प्रवेशासाठी उपलब्ध आहेत. डीटीई मार्फत सदरील प्रवेश प्रक्रिया राबवण्यात येते. या प्रवेश प्रक्रियेमध्ये प्रवेशाचे एकूण चार राउंड ठेवण्यात आले आहेत.

आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.elaturprabhat.in

# ट्रम्प धोरणाला लगाम हवा !

## संपादकीय...

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे भारता सोबत दृढ मैत्री करतानाच भारताची आर्थीक कोंडी करण्याचा प्रयत्न करताना दिसत आहेत. आयात शुल्क करात वाढ करणे, चीन, पाकिस्तानाला जवळ करणे आणी भारत–रशियाच्या करारावर करडी नजर ठेवून भारताला विकलांग करण्याचे प्रयत्न ट्रम्प हे नेहमीच करीत आलेले आहेत. अमेरिका नेहमीच भारताच्या परराष्ट्र धोरण, आर्थीक धोरण, अण्वस्त्र धोरण, आणी विकासात्मक धोरणाला नकळत विरोध करताना दिसत असल्याची कुजबूज सर्वत्र होताना दिसते. नेहमीच अमेरिका, राष्ट्राध्यक्ष ट्रम्प समोर पायघड्या घालून अमेरिकेशी घनिष्ठ मैत्री ठेवून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी काय साध्य करु पाहात आहेत यावर सारं कांही अवलंबून असेल अशी राजकीय वर्तूळातून प्रतिक्रिया व्यक्त होताना दिसते ती नाकारता येण्यासारखी नक्कीच नसावी असे वाटते.

पहलगाम दहशतवादी हल्ला प्रकरणी पाकधार्जीणे धोरण स्विकारुन डोनाल्ड ट्रम्प यानी भारतावर, प्रधानमंत्री नरेंद्र मोदीवर अप्रत्यक्ष दबाब आणून शस्त्रबंदी घेण्यास भाग पाडले, भारतीय तिन्ही दलातील अधिकारी, सैनिकाना तो निर्णय मान्य नसला तरी सरकारच्या निर्णयामूळे पाकीस्तानला अभय मिळाले, नौदल, भूदल, हवाई दल प्रमूखानी आपापली भूमिका विशद केली. त्यावर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यानी स्पष्टीकरण दिले नाही पंरतू शस्त्रबंदीचे श्रेय लाटत पूर्व केंद्रीय सरकारला लक्ष्य केले. पहलगाम हल्ला प्रसंगी सर्वपक्षीय नेते, जनता प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या पाठीशी उभी राहीले तरी ही प्रधान मंत्री मोदीजी, अमित शहा वगैरे कॉग्रेसवर टीका केली पण अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प याना हस्तक्षेप का केला या संदर्भात विचारपूस करण्याची हिंमत दाखविली नाही आजतर ट्रम्प हे भारतीय आर्थीक नाडची कमकूवत करु पाहात आहेत, केवळ आम्ही असे करु तसे करु असे बोलत न बसना केंद्र सरकार, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यानी डोनाल्ड ट्रम्प याना जशास तसे उत्तर देणे गरजेचे वाटते, एवढेच नव्हे अमेरिकन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या धोरणाला, कृतीला लगाम घालण्याची गरज सर्वत्र सर्वस्तरातून व्यक्त होताना दिसते आहे हे केंद्र सरकारने लक्ष्यात घेणे गरजेचे असल्याची लोकभावना व्यक्त होताना दिसते आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यानी आजवरच्या परदेश वाऱ्यात अब्जावधी रुपयाचा चूराडा केला तो केवळ मैत्री बळकट करणे आणी व्यापार वृध्दीगत करण्यासाठी केला पण त्यापट्टीने भारतीय अर्थव्यवस्था बळकट करण्यासाठी लक्ष्य केंद्रीत करण्याची गरज भासते आहे. जागतीक अर्थव्यवस्थे संदर्भात गेल्या महिण्यात जी आकडेवारी जाहिर झाली ती अमेरिकेतील एका कंपनीची जी आर्थीकप्रगती आहे तेवढी भारताची आहे असे बोलले जाते याची सत्य, असत्यता पडताळून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यानी व्यापार, उद्योग, कृषी क्षेत्राकडे प्रगतीच्या हेतूने लक्ष्य देणे गरजेचे असलयाचे व्यापार जगतात कुजबूज होताना दिसते आहे. उठसूठ तत्कालीन सरकारवर टीका करणे, कॉग्रेसला लक्ष्य करणे हे सोडून भारताची आर्थीक परिस्थिती, अर्थव्यवस्था कशी बळकट होईल, याचा प्रामाणीक विचार करुन भारताचा कारभार हाकावा, केवळ विरोधी पक्ष कमकूवत करुन बहूमताच्या आधारावर मनमानी, करण्यापेक्षा अमेरिकन डोनाल्ड ट्रम्प याना आव्हाण देण्याची खरी गरज आहे. हेच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यानी कर्तव्य, अधिकार समजून कार्यरत राहून अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प याना त्यांच्या धोरणाला कृतीतून लगाम घालणे हेच प्रधानमंत्री मोदी यांचे आद्यकर्तव्य ठरते अशी लोकभावना व्यक्त होताना दिसते आहे.

## ओटीटी प्लॉटफॉर्मसाठीही सेन्सॉरबोर्ड हवे

कोरोना काळात लॉकडाउन असल्याने चित्रपटगृहे बंद होती अशावेळी नवीन चित्रपटांच्या प्रसारणासाठी निर्माते, दिग्दर्शकांनी ओटीटी प्लॅटफॉर्मला पसंती दिली. प्रेक्षकांनाही हा नवा पर्याय खूप आवडला कारण चित्रपटगृहात न जाता घरात बसून आपल्या लॅपटॉपवर, कॉम्प्युटरवर किंवा अगदी हातातल्या मोबाईलवर देखील नवा चित्रपट पाहायला मिळू लागला त्यामुळे प्रेक्षक ओटीटी प्लॅटफॉर्मला पसंती देऊ लागले.

ओटीटी प्लॅटफॉर्मची लोकप्रियता जशी वाढत गेली तसे निर्माते दिग्दर्शक या प्लॅटफॉर्मवर चित्रपट प्रदर्शित करू लागले. त्यातही सलग तीन तास छोट्या स्क्रीनसमोर प्रेक्षकांना बसणे शक्य होत नाही हे लक्षात आल्यावर निर्मात्या दिग्दर्शकांनी त्यालाही पर्याय शोधून काढला तीन तासांचे चित्रपट सहा ते दहा भागात वेबसिरीजच्या रूपात प्रदर्शित करू होऊ लागले. ओटोटीच्या या वेबसिरीजला प्रेक्षकांनी अक्षरशः डोक्यावर घेतले.

हिंदी वेबसिरीजने तर कमालीची लोकप्रियता मिळवली. या वेबरीजममध्ये चित्रपटसृष्टीतील सर्वच दिग्गज कलाकार भाग घेऊ लागले. चित्रपटगृहात चित्रपट प्रदर्शित करण्यासाठी सेन्सॉरबोर्डची मान्यता आवश्यकता असते. तशी वेबसिरिजना नसते त्यातही या वेबसिरीजचे सर्वाधिक प्रेक्षक हे २० ते ४० या वयोगटातील म्हणजे तरुण असतात. सेन्सॉरबोर्ड नाही आणि प्रेक्षक तरुण मग काय निर्माते दिग्दर्शकांनी वेबसिरीजद्वारे ओटीटी प्सवर अश्र्लीलतेचा भडिमार सुरू केला. अश्र्लीलतेचा भडिमार असलेल्या अशा शेकडो प्स ओटोटी प्लॅटफॉर्मवर धुमाकूळ घालू लागल्या. अलीकडील काळात तर अश्र्लील ओटोटी प्सचा इंटरनेटवर महापूर आला. या ओटोटी प्सवर अश्र्लीलतेचा अक्षरशः नंगानाच चालू झाला.

फेसबुक, इंस्टाग्राम यासारख्या सोशल मीडिया साईटवर या ओटीटी प्स आणि वेबसिरीजची अश्र्लील दृश्ये मुद्दामहून प्रसारित केली जाऊ लागली जेणेकरून तरुण मुले ही प्स आणि वेबसिरीज पाहतील. तरुण मुलांना अश्र्लीलतेकडे घेऊन जाणाऱ्या या अश्र्लील प्सवर आणि वेबसिरीजवर बंदी आणावी अशी मागणी होऊ लागली. गल्लीपासून दिल्लीपर्यंत सर्वत्र ही मागणी होऊ लागली. संसदेत देखील काही खासदारांनी अश्र्लील प्सवर बंदी घालावी अशी मागणी केली. काही सुजाण नागरिकांनी त्यासाठी न्यायालयाची दारे देखील ठोठावली. सुजाण नागरिकांच्या या मागणीला अखेर यश मिळाले. मागील आठवड्यात केंद्र सरकारने देशातील २५ ओटीटी प्स वर बंदी घातल्याची घोषणा केली.

बंदी घालण्यात आलेल्या ओटीटी प्समध्ये उल्लू, एएलटीटी आणि डिसिफ्लिक सारख्या काही मोठी नावे समाविष्ट आहेत. माहिती प्रसारण मंत्रालयाने यासंदर्भात एक अधिसूचनाही जारी केली आहे. त्यात म्हटले आहे की या निर्णयाचा मुख्य उद्देश अश्र्लील सामग्रीचा प्रसार रोखणे हा आहे. अशी सामग्री भारतीय कायदेशीर आणि सांस्कृतिक मानकांचे उल्लंघन करणारी मानली जातात. बंदी घालण्यात आलेल्या अन्य प्समध्ये बिगशॉट, बूमएक्स, नवरासा लाईट, गुलाब प, बुल प, जलवा प, कंगन प, वॉव एंटरटेनमेंट, लुक एंटरटेनमेंट, हिट प्राईम, फेनियो, शोएक्स, सोल टॉकिज, अड्डा टीव्ही, हॉट एक्स, व्हीआयपी, हलचल प, मूड एक्स, निऑन एक्स, फुगी, मोजफ्लिक्स, ट्रायफ्लिक्स यांचा समावेश आहे. सरकारने इंटरनेट सेवा प्रदात्यांना भारतात या वेबसाइटवर सार्वजनिक प्रवेश थांबवण्याचे निर्देश दिले आहेत. सरकारने घेतलेला हा निर्णय स्वागतार्ह आहे. या अश्र्लील प्सवर बंदी घालण्याच्या सरकारच्या निर्णयाचे सर्वत्र स्वागतच होत आहे. केवळ या २५ प्सवरच नाही तर यासारख्या ज्या ज्या प्सवर अश्र्लीलतेचा नंगानाच चालू आहे अशा सर्वच प्सवर सरकारने बंदी घालायला हवी.

याशिवाय ओटीटी प्लॅटफॉर्मवर सुरू असणाऱ्या सर्वच अश्र्लील वेबसिरिजवर देखील बंदी घालायला हवी. ओटीटी प्लॅटफॉर्मवर चालू असलेल्या अश्र्लील वेबसिरिज समाजाचा समतोल बिघडवत आहेत. या वेबसिरीज मोबाईलवर पहायला मिळत असल्याने अल्पवयीन मुलेही या वेबसिरीज चवीने पाहत असतात. वेबसिरिजसाठी सेन्सॉरबोर्ड नसल्याने यात काहीही दाखवले जाते. आक्षेपार्ह, अश्र्लील, लोकांच्या भावना दुखावणारे, भावना चाळवणारे, हिंसेला, व्यसनाला प्रोत्साहन देणारे असे सर्व ज्यांच्यावर सर्वसाधारण स्थितीत बंदी घातली जाऊ शकते किंवा प्रौढांसाठी म्हणून बिरूद लावले जाऊ शकते असे सर्वकाही दाखवले जाते. सेन्सॉरबोर्ड नसल्याने निर्माते दिग्दर्शक आक्षेपार्ह दृश्ये दाखवतात. वेबसिरिजना चित्रपटासारखे स्वतंत्र सेन्सॉरबोर्ड लागू केले तर या गोष्टींना आळा बसेल चित्रपट असो की वेबसिरीज सेन्सॉरबोर्डने मान्यता दिल्याशिवाय ओटोटी प्लॅटफॉर्मवर दाखवण्यात येऊ नये.

श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

## रक्षाबंधन बहिण–भावांचे पवित्र नाते ;या निमित्ताने व्हावे वृक्षारोपण.

रक्षाबंधन हा सण बहिण–भावाचा सण म्हणून राज्यासह देशात ओळखला जातो. राखीचा धागा साधासुधा नसुन अतुट बंधन आहे.भारतात सर्वच जातीधर्माचे लोक रक्षाबंधन मोठ्या उत्साहाने व आनंदाने साजरा करतात.यात भावाने बहिणीला दिलेले वचन अत्यंत महत्त्वाचे असते.

पंचागानुसार श्रावण महिन्यातील म्हणजे राखी पौर्णिमा याला नारळी पौर्णिमा सुध्दा म्हणतात.हा सण भारतीय संस्कृतीच्या सणांमध्ये प्रमुख सण आहे.यामुळे बहिण–भावात उत्साहाचे वातावरण निर्माण होते. भारतात संपूर्ण राज्यात राखी पौर्णिमा वेगवेगळ्या पध्दतीने साजरी केली जाते. उत्तर भारतात कजरी पौर्णिमा,पश्र्चिम भारतामध्येनारळी पौर्णिमाया नावाने हा सण साजरा केला जातो.पुराणात सांगितल्याप्रमाणे श्रावण पौर्णिमेला मोठ्यांचे आशीर्वाद पवित्र मानल्या जाते. पुर्वी मध्ययुगीन काळात भारतामध्ये बाहेरील आक्रमणापासून महिलांचे संरक्षण करण्यासाठी हा सण साजरा करण्यात येत असे. महाभारतात सुध्दा बहिणभावाचे अतुट बंधन दिसून येते.

श्रीकृष्णाच्या हाताच्या बोटाला जखम होऊन त्यातून रक्त वाहत होते त्यावेळी पांडवांची पत्नी द्रौपदीने आपल्या साडीची किनार फाडून श्रीकृष्णाच्या बोटाला बांधली आणि त्यांचा रक्तस्राव थांबवला.तेव्हापासुन श्रीकृष्णाने द्रौपदीचे रक्षण करण्याचा संकल्प केला आणि आजीवन द्रौपदीचा भाऊ म्हणून तिचे रक्षण केले.म्हणजेच रक्षाबंधनाची परंपरा दैवी काळापासून तर आजपर्यंत आजतागायत सुरू आहे.यावरून हेच लक्षात येते की बहिणीच्या रक्षणासाठी भाऊ काहीही करायला तयार असतो.अशा इतिहासात अनेक गोष्टी आपल्याला पहायला मिळतात. चित्तोढगडची राणी कर्मावती हिने बहादुरशहा पासून आपली रक्षा करण्यासाठी मुघल बादशहा हुमायूला राखी बांधली होती.राखी बांधल्यानंतर राजा हुमायूने राणी कर्मावतीच्या रक्षणासाठी आपल्या प्राणांची बाजी लावली असे सांगण्यात येते.यावरून स्पष्ट होते की भाऊ आपल्या बहिणीच्या रक्षणासाठी जान जाये पर वचन न जायेअशी भूमिका बहिणीबद्दल भावांमध्ये दिसून येते. संपूर्ण भारतात रक्षाबंधन हा सण मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. रक्षाबंधन म्हणजे बहीण –भावाच्या अतुट बंधन.म्हणजेच बहिण–भावाच्या नात्याचा सुवर्ण महोत्सव. कारण यामुळे दोघांचेही प्रेम एकत्र येऊन भाऊ बहीणीला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देतो व कठीण प्रसंगी धावुन येण्याचे वचन देतो.

यामुळे बहिण –भावाचे प्रेम अफाट असल्याचे दिसून येते.सध्या बहिण –भावाप्रमाणे आज वृक्षांना आपल्या बंधनात बांधण्याची नितांत गरज आहे. कारण वृक्ष रहाली तर जमीन (पृथ्वी) राहील,पृथ्वी शाबूत रहाली,तर मानव व संपूर्ण जीवजंतू आणि सृष्टी सुरक्षित राहील.कारण दिवसेंदिवस वृक्षतोडीमुळे पृथ्वी डगमगायला लागली आहे यामुळे भूस्खलन, भूकंप, सुनामी, ज्वालामुखीचा उद्रेक,अती थंडी,अती उष्णता,अती पाऊस अशाप्रकारच्या कधीच न घडलेल्या घटना दिवसेंदिवस वाढत आहेत याकरीता पृथ्वीला वाचविण्याची जबाबदारी आपणा सर्वांवर असल्यामुळे जास्तीत जास्त वृक्षारोपण अती आवश्यक आहे.बहिणीने भावाला राखी अवश्य बांधावी.

परंतु सोबतच एक वृक्ष भेट देऊन त्यांची जोपासना करण्याचे वचनसुध्दा घ्यावे.कारण दिवसेंदिवस हवामानात बदल होतांना दिसत आहे.यामुळे अनेक पशुपक्षांचे जगणे अत्यंत कठीण झाले आहे व काही पशुपक्षी व वृक्ष लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत.पुर्वी मुसळधार व संथ गतीने पाऊस यायचा. परंतु बदलत्या हवामानामुळे मुसळधार पाऊसाचे प्रमाण मोठ्याप्रमाणात वाढल्याचे दिसून येते व यामुळे ढगफुटीचे व सुनामीचे प्रमाण सुध्दा वाढले आहे. यामुळे मानवी हानी,शेतीचे नुकसान, वित्तीय हानी,समुद्राच्या पातळीत वाढ, सुनामी,भुकंप, वादळ,विजकोसळने,अती उष्णता,अती थंडी ह्या संपूर्ण भयावह घटना निसर्गाचे संतुलन डगमगल्याने निर्माण झाल्याचे दिसून येते.

मानव हा बुध्दीजीवी प्राणी आहे त्यामुळे येणाऱ्या संकटांशी सामना अवश्य करू शकतो. याकरीता रक्षाबंधनाच्या निमित्ताने संपूर्ण भारतात वृक्षारोपण व्हायला हवे. त्याचबरोबर बहिणीने भावाला किंवा भावाने बहिणीला काय मौल्यवान वस्तू भेट द्यायच्या आहेत त्या अवश्य द्याव्यात.परंतु बहिणीने भावाला व भावाने बहिणीला एक –एक वृक्ष भेट देऊन धर्तीमातेचे रक्षण करण्याचा संकल्प सर्वांनीच घेतला पाहिजे. यामुळे संपूर्ण भारतात हिरवागार गालिचा निर्माण होईल.

येणारे पाऊसाचे पाणी जमिनीत मुरेल व पृथ्वीचे संतुलन सुरक्षित राहील, ग्लेशियर वितळणे थांबेल, वणव्याचे प्रमाण कमी होईल,भुकंपावर आळा बसेल, अशाप्रकारे निसर्गावर येणारे संकट वृक्षलागवडीमुळे हळूहळू कमी होण्यास मोठी मदत होईल व निसर्ग प्रफुल्लित होईल. वृक्षलागवड सांस्कृतिक, सामाजिक,सण उत्सव, राष्ट्रीय कार्यक्रम, आंतरराष्ट्रीय कार्यक्रम अशा कोणत्याही मार्गाने होने अत्यंत गरजेचे आहे. कारण यामुळे पृथ्वीचे संतुलन स्थीर रहाण्यास मोठी मदत होईल व हवामानातील वाढता बदल यावर अंकुश लावण्यास सर्वांचा हातभार कामी येईल. त्याचप्रमाणे निसर्ग प्रफुल्लित रहाला तर देशात पर्यटनाला सुध्दा मोठी चालना मिळेल. त्यामुळे रक्षाबंधनाचे औचित्य साधून बहिण–भावाने वृक्ष भेटीवर जास्तीत जास्त भर देण्याची गरज आहे.

त्याचप्रमाणे सरकारने सुध्दा संपूर्ण सणांचे औचित्य साधून जास्तीत जास्त वृक्षलागवडीकडे लक्ष देण्याची गरज आहे.सरकारने राज्यात लाडकी बहिण योजना अंमलात आणली याचे मनापासून स्वागतच अशा प्रकारच्या योजना अंमलात आणल्यानंतर प्रत्येकांना सरकारने एक–एक वृक्ष भेट देऊन पर्यावरण वाचविण्याच्या बंधनात सहभागी केले पाहिजे.सोबतच संपूर्ण प्रशासकीय विभाग,शाळा–महाविद्यालये यांना या पवित्र दिनाच्या निमित्ताने वृक्षलागवडीसाठी सरकारने प्रोत्साहीत करून निसर्गाला वाचविले पाहिजे.नारळी पौर्णिमा व रक्षाबंधनाच्या हार्दिक शुभेच्छा!

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

## ग्रंथमित्र पुरस्कार विजेते सूर्यकांत जाधव यांच जिल्हा ग्रथालय अधिकाऱ्यांकडून अभिनंदन

लातूर : महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या वतीने देण्यात येणारा वर्ष २०२३ –२४ चा ग्रंथालय चळवळीतील उत्कृष्ट ग्रंथालय सेवक ( ग्रंथमित्र ) पुरस्कार औसा तालुक्यातील आलमला येथील स्वामी विवेकानंद सार्वजनिक वाचनालयाचे ग्रंथपाल सूर्यकांत कमलाकर जाधव यांना जाहीर झाला आहे. त्याबद्दल लातूरच्या जिल्हा ग्रंथालय अधिकारी श्रीमती वंदना काटकर – देशमुख यांनी सूर्यकांत जाधव यांचे अभिनंदन केले आहे. तसेच छत्रपती संभाजीनगरचे सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे यांसह अनेक मान्यवरांनी जाधव यांचे अभिनंदन केले आहे.

डॉ. एस.आर. रंगनाथन उत्कृष्ट ग्रंथालय सेवक ( ग्रंथमित्र ) पुरस्काराचा वितरण सोहळा मंगळवार दि. १२ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी चार वाजता पाटकर सभागृह, एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, नाथीबाई ठाकरसी मार्ग, चर्चगेट, मुंबई येथे आयोजित करण्यात आला आहे. या पुरस्काराचे स्वरूप रोख २५ हजार रूपाने, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र असे आहे. सूर्यकांत जाधव हे मागच्या २७ वर्षांपासून सार्वजनिक ग्रंथालय



क्षेत्रात ग्रंथपाल म्हणून कार्यरत आहेत. औसा तालुक्यात सार्वजनिक ग्रंथालय चळवळ वृद्धिंगत करण्याकामी त्यांचे मौलिक योगदान राहिले आहे. या पुरस्काराचे आणखी एक महत्वपूर्ण वैशिष्ट्य म्हणजे, स्वामी विवेकानंद वाचनालयाला राज्य शासनाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कार मिळालेला असून या वाचनालयाचे सचिव प्रभाकर कापसे यांनाही राज्यस्तरीय ग्रंथमित्र कार्यकर्ता पुरस्कार प्राप्त झालेला आहे. आता या वाचनालयाच्या ग्रंथपालांनाही उत्कृष्ट ग्रंथालय सेवक ( ग्रंथमित्र ) पुरस्कार घोषित झाला आहे. एकाच वाचनालयाने तीनही पुरस्कार पटकावण्याचा अनोखा विक्रम नोंदवला असून राज्यात एकाच वाचनालयाशी संबंधित संस्था, सचिव व ग्रंथपाल या तिघांनाही हा पुरस्कार मिळविण्याची किमया साधणारे हे एकमेव ग्रंथालय असावे.

या पुरस्काराबद्दल सूर्यकांत जाधव यांचे जिल्हा ग्रंथालय निरीक्षक राजेंद्र कोरे, सुधीर आचार्य, हिरालाल पाटील यांच्यासह ग्रंथालय कर्मचारी परिषदेचे संस्थापक अध्यक्ष सदाशिव बेडगे, कर्मचारी विकास परिषदेचे मराठवाडा विभागाचे अध्यक्ष गंगाधर पोतंगले, उपाध्यक्ष विद्यासागर हणमंते, बालाजी कांगणे, श्रीधर स्वामी, संतोष करमले, जहांगीर सय्यद, वैशाली दुरुगकर, विकास चिरके , गिरीधर जंगाले, काशिनाथ बोडके, गुप्तलिंग स्वामी, मनिषा पाचंगे, नागनाथ नागरगोजे, मनोहर गायकवाड, तुकाराम सुगावकर, चंद्रकांत पौळ , शिवहार बिराजदार, कृष्णा पिंगळे, नागेश्र्वरी पांचाळ, हणमंत भव्हाळ , गोवर्धन पाटील, धनंजय वैजवाडे, चंद्रशेखर ढगे , अंगद पांचाळ, अरविंद उबाळे यासह अनेक मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

## झरोका

एक – भारताचे पहिले पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरु यांच्यावर सिंधू करार, १९८५ यूध्द पाकव्याप्त काश्मीर प्रकरणावरुन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी नेहमीच टीका करतात तर नेहरु सरकारमधील सरदार पटेल यांचे कौतूक करतात, हे सारे मोदीजीच्या कलनानुसार ठीक आहे पंरतू मोदी सरकार मधीलच केंद्रीय मंत्री जाहीरपणे म. गांधी, पं. जवाहरला नेहरु यांच्या धोरणाची प्रशंसा करतात ते नितीन गडकरी आणी प्रधानमंत्री मोदी यांची कशी तूलना करावी हेच प्रसार माध्यमाना कळत कसे नसेल यांचे आश्चर्य वाटते. डोकं बधीर झालय.

दुसरा – अरे, अरे मंत्री नितीन गडकरी हे वास्तवाला धरुन बोलत असतात, उत्पादन वाढविण्यासाठी लोकसहभागातून उत्पन्न वाढवायला पाहजे असे म.गांधी म्हणत असत तर तत्कालीन पंतप्रधान नेहरु आम्हाला भारताला जास्तीत जास्त उत्पादन हवे त्याविना अर्थव्यवस्था बळकट होणार ाही असे म्हणत असता हा दाखला गडकरी यानी दिला पण टीका करुन मागील सरकार आणी कॉग्रेसनेत्याला बदनाम करणे हे एकच काम मोदीजीच असल्याने ते करतात तू कशाला या भानगडीत पडतोस.

एक – अहो, मला यात कांहीच उणे, दुणे करायचे नाही पंरतू मोदी सरकार मधील मंत्री गडकरी हे वास्तव बोलतात मग प्रधान मंत्री नरेंद्र मोदी हे अवास्तव कसे काय बोलतात म्हणून बोलतोय.

दुसरा – अरे, मंत्री नितीन गडकरी हे राष्ट्रीय स्वंयसेवक संघ, भाजपाचे कट्टर नेते असले तरी स्वंयभू विचार, अधिकाराने कार्यरत असतात पण प्रधान मंत्री नरेंद्र मोदी यांचे जसे नाही आरएसएस ने त्याना जो अजेंडा दिलेला आहे त्याप्रमाणे ते कार्यरत असतात, विधाने करीत असतात म्हणूनच आरएसएसने वयाची अट लादून त्यांच्या, मोदीजीच्या निवृतीचे संकेत दिले आहेत. यावरुनच मोदीजी स्वंयभू नाहीत हेच सिध्द होते. मग आपला काय दोष आहे नाहीच.

## काय बोलता राव ?

एका खून प्रकरणात मंत्री धनंजय मुंडे यांचे नांव आल्याने त्यांना मंत्रीपदाचा राजीनामा द्यावा लागला होता. राजीनामा दिल्यानंतरही चार महिने उलटून गेले तरी त्यांनी शासकीय बंगला रिकामा केलेला नाही. भाड्यापोटीची रक्कम ४२ बेचाळीस लाखावर पोंहचली असली तरी बाकी जाऊ द्या पंरतू भाडे कर म्हणून माजी मंत्री धनंजय मुंडे यांचेकडे ४२ लाख रुपयाची देणी ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे त्यांच्या अधिकारातून माफ करु शकतात. करणारच झाले यूती आहे ना, हाच न्यायीक पारदर्शक कारभार आहे, फडणवीस सरकारचा.

### काय बोलता राव !

अहो, साधी पाच, पन्नास हजार रुपयाची घरपट्टी थकली तर त्या गरीब, कामगार, बेरोजगार व्यक्तीच्या घराची, घरातील वस्तूची जप्तीकरण्यासाठी नगरपालीका, महानगरपालीका तत्पर असते. त्यावर कोणी बोलत नाही, बाकी काय ते वाढून जाते पण काय लाखो रुपयाचे देणे असताना पूढारी, नेता, माजी मंत्री म्हणून त्यास माफ केले जाते अनेक व्यापारी, उद्योजक कर्ज बूडवून परदेशात निघून जातात त्यावर राज्य सरकार किंवा केंद्र सरकार कांहीच कारवाई करीत नाही पंरतू गरीबाला मात्र वेठीस धरते हाच न्यायीक पारदर्शक कारभारत म्हणावा लागेल, चोर, लूटारुला सोडून संन्याशाला फाशी हेच तत्व बळकट होणार असेल तर छत्रपती शिवाजी महाराज, म.फुले, रा, शाहू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महाराष्ट्राचे, विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजितदादा पवार यांच्या महाराष्ट्राचे काय मग बोलादाजीबा !



**फेक --**

अल्प फायदा दिसता
का फेकन्यूज फेकता
चवीने पाहती सगळे
बातमी ओरा फाकता

मालक चतुर्थ स्तंभाचे
आत्मा उगाचं विकता
ताठ मानी पत्रकारिता
धनाढ्यांसमोर वाकता

अमूल्य मुल्ये विसरता
पवित्रता वसा टाकता
घोड दौड शानदार ती
अध्ये मध्ये का रुकता

क्षणभंगुरप्रसिध्दीस्तव
मोहजाला मध्ये रमता
मसालाभरी प्रेझेंटेशन
कसली लोभस रम्यता

पाय हवेत मायमातीत
नभा गवसणी घालता
अंति हाती मोठे शून्य
घडा ठेवलेला पालथा

शपथ घेतलेली पेशात
जपायची विश्र्वासार्हता
चुकवते पावित्र्यपथास
कसली रे अपरिहार्यता

**वास्तव --**

ज्यांच्या मधून कधी
जात नव्हता विस्तव
त्यांच्यासोबत दोस्ती
गंभीरस्थिती वास्तव

नीत करे दगाफटका
गाठीशीजुनाअनुभव
कशी झाली किमया
एकत्रबसे महानुभाव

गठबंधन बांधले तरी
वाटले जरी अ संभव
खुणावते सुवर्ण संधी
मोहमयी सत्ता वैभव

लढून पाहिले विभक्त
झाला दारुण पराभव
फसले विभिन्न प्रयोग
जनमानसाचापरिभव

फसले एकला चलो रे
निरूपयोगी अविर्भाव
नव लाट येई अचानक
मतैक्यावर करे प्रभाव

जिद्दहवीय जिंकायची
यंदातरी बाबा सप्रभव
दोष द्यायचा दुस-यांस
ये जरीपदरी अभिभव

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६.**

# जिल्हा वार्षिक योजनेतून साकारल्या जाणाऱ्या विविध विकासकामांची कल्पना स्थानिक लोकप्रतिनिधींना द्यावी - पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

नागपूर, : जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत विविध विभागांना उपलब्ध करुन दिलेल्या निधीतून विविध योजना साकारल्या जातात. यातून नाविन्यपूर्ण योजना आकारास येतात. या कामांमधून विविध ठिकाणी असलेल्या इतर व्यावसायिक आस्थापनातून अप्रत्यक्षपणे स्वयंरोजगाची निर्मिती होत राहते. जिल्हा वार्षिक योजनेतील कामे निश्र्चित करताना यापुढे ज्या भागात ही कामे प्रस्तावित केली आहेत त्या भागातील लोकप्रतिनिधींना विभाग प्रमुखांनी कल्पना देऊन कामे प्रस्तावित करण्याचे निर्देश राज्याचे महसूलमंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.

जिल्हा नियोजन भवन येथे आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस महानगरपालिका आयुक्त डॉ. अभिजित चौधरी, नागपूर सुधार प्रन्यासचे सभापती संजय मिना, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी व वरीष्ठ अधिकारी उपस्थित होते.

जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत यापूर्वी ज्या विभागांकडे निधी वर्ग करण्यात आलेला




आहे त्यांनी कोणत्याही स्थितीत येत्या १५ ऑगस्टपर्यंत त्या-त्या योजनांसाठी शासन निर्णयानुसार निधी खर्ची घालण्याबाबत योग्य ती खबरदारी व पूर्तता करण्याचे निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले. लोकाभिमुख प्रशासनासह सर्व सामान्य जनतेला शासकीय योजनांचा सुलभ लाभ पोहोचावा यासाठी आपण कटीबद्धता स्विकारली आहे. सर्वांसाठी घरे ही महत्वाकांक्षी योजना असून जिल्हा प्रशासन, मनपा, नागपूर सुधार प्रन्यास, जिल्हा परिषद यांनी परस्पर समन्वय ठेवून पट्टेवाटप मोहीमेला अधिक गती देण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

येत्या काही दिवसात विविध सण व उत्सवासह सर्वांच्या भक्तीचा गणेशोत्सव सुरु होत आहे. विविध मंडळांना त्यांना आवश्यक त्या परवानग्या, सुरक्षितता मिळावी, गणपतीचे विसर्जन श्रद्धापूर्वक करता यावे यासाठी कुत्रिम तलावाची निर्मिती ही कामे मनपाने युद्धपातळीवर केली पाहिजे. मनपाच्या प्रत्येक झोननिहाय एकखिडकी योजना यासाठी सुरु करण्यास त्यांनी सांगितले. जिल्हा प्रशासन, जिल्हा परिषद, महानगरपालिका, जिल्हा पोलीस अधीक्षक, एनएमआरडीए, पोलीस आयुक्त यांनी एकत्रित येऊन या गणेशोत्सवात अधिक सूत्रबद्ध होऊन नियोजन करावी, असे त्यांनी सांगितले.

## इतिहासात आजचा दिवस ५ ऑगस्ट २०२५

अंतरराष्ट्रीय

१९०० – हेन्री पहिला ईंग्लंडच्या राजेपदी.
१३०५ – स्कॉटिश क्रांतीकारी विल्यम वॉलेस ग्लासगो जवळ पकडला गेला.
१८६० – कार्ल चौथा स्वीडनच्या राजेपदी.
१८६१ – अमेरिकन गृहयुद्ध – युद्धाच्या खर्चास हातभार लागावा म्हणून अमेरिकन सरकारने प्रथमत– आयकर लागू केला.
१८८२ – जपानमध्ये लश्करी कायदा लागू.
१९०१ – पीटर ओ'कॉनोरने २४ फूट ११.७५ ईंच लांब उडी मारून विश्वविक्रम रचला.
१९१४ – जगातील पहिला विद्युतचलित वाहतूक नियंत्रक दिवा अमेरिकेच्या क्लीव्हलँड शहरात सुरू झाला.
१९४४ – दुसरे महायुद्ध – ऑस्ट्रेलियाच्या कौरा गावाजवळील युद्धबंद्यांच्या तुरुंगातून ५४५ जपानी युद्धबंदी पळाले. बव्हंशी मारले गेले व उरलेल्यांपैकी मोठ्या संख्येने आत्महत्या केली.
१९४४ – ज्यूंचे शिरकाण – पोलिश क्रांतीकाऱ्यांनी वॉर्सोतील कारागृहातून ३४८ बंद्यांची सुटका केली.
१९४९ – इक्वेडोरमध्ये भूकंप. ६,००० ठार.
१९६० – बर्किना फासोला फ्रांसपासून स्वातंत्र्य.
१९६२ – मॅरिलिन मन्रोने आत्महत्या केली.
१९६२ – दक्षिण आफ्रिकेत नेल्सन मंडेलाला कैद. २८ वर्षांनी ई.स. १९९०मध्ये सुटका.
१९६४ – व्हियेतनाम युद्ध – अमेरिकेच्या यु.एस.एस. टिकोंडेरोगा व यु.एस.एस. कॉन्स्टेलेशन या विमानवाहू युद्धनौकांवरील विमानांनी टोंकिनच्या अखातातील हल्ल्यास प्रत्युत्तर म्हणून उत्तर व्हियेतनामवर बॉम्बफेक केली. वस्तुत– टोंकिनच्या अखातातील हल्ला ही बनावट घटना होती.
१९८१ – अमेरिकेन राष्ट्राध्यक्ष रोनाल्ड रेगनने संपावर असलेल्या ११,३८१ हवाई वाहतूक नियंत्रकांना नोकरीतून काढून टाकले.
१९९५ – क्रोएशियाच्या सैन्याने सर्बियातील क्निन शहर जिंकले.
२००६ – इस्त्राइलच्या हवाई हल्ल्यात ४० लेबनॉनी ठार झाले.
२००६ – श्रीलंकेच्या लष्कराने हवाई हल्ला करुन १५२ तामिळ बंडखोरांना ठार केले.

राष्ट्रीय

२००६ – मराठी विकिपिडीयाने ५,००० लेखांचा टप्पा ओलांडला.
२००६ – भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते जसवंत सिंह यांच्या विरुध्द पंतप्रधान कार्यालयाने हस्तक प्रकरणी देशाची दिशाभूल करण्याच्या आरोपावरून सदर पोलिस ठाण्यात राष्ट्रद्रोहाचा खटला दाखल केला.
२००७ – प्रसिद्ध निवेदक सुधीर गाडगीळ, दिग्दर्शक केदार शिंदे, अभिनेता भरत जाधव यांच्यासह १३ जणांना आचार्य अत्रे स्मृति प्रतिष्ठानतर्फे आचार्य अत्रे पुरस्कार जाहीर झाला.
२००८ – दिल्ली उच्च न्यायालयाने शिक्षण क्षेत्रात मुस्लिम विद्यार्थ्यांना आरक्षण देण्याची सशर्त परवानगी आंध्र प्रदेश सरकारला दिली.

जन्म

१९२३ – दीवान नायर, सिंगापुरचे राष्ट्राध्यक्ष.
१९३० – मायकल कोवाक, स्लोवाकियाचे राष्ट्राध्यक्ष.
१९७५ – काजोल देवगण, बॉलीवुड अभिनेत्री.
१९७५ – जेलीना डीसुझा, बॉलीवुड अभिनेत्री.

निधन

८८२ – लुईस तिसरा, फ्रान्सचा राजा.
१३६४ – कोगोन, जपानचा राजा.
१७९२ – फ्रीड्रीक नॉर्थ, युनायटेड किंग्डमचे पंतप्रधान.
१९६० – ऑर्थर मेघेन, कनाडाचे नववे पंतप्रधान.
१९९१ – सोईचेरु होन्डा, होन्डा मोटर कंपनीचे संस्थापक.
२००६ – नंदिनी शतपथी, ओरिसाच्या माजी मुख्यमंत्री.

# महसूल विभाग म्हणजे 'लोकसेवा' - पालकमंत्री डॉ. वुईके

चंद्रपूर, : सामान्य नागरिकांसाठी सरकार म्हणजे महसूल विभाग. कोतवाल ते जिल्हाधिकारी हे सामान्य नागरिकांकरिता शासनाचे प्रतिनिधी म्हणून समर्पित भावनेने कर्तव्य बजावतात. त्यामुळे त्यांच्या कामात पारदर्शकता, जलद गती आणि लोकाभिमुखता असणे अत्यावश्यक आहे. महसूल विभाग हा केवळ प्रशासनाचा भाग नाही, तो 'लोकसेवेचा खरा प्रतिनिधी' आहे. त्यामुळे महसूल विभागात काम करणाऱ्या प्रत्येक कर्मचाऱ्याकडून निष्ठा, पारदर्शकता आणि सामाजिक जाणिव यांचा सदैव विचार व्हावा व कालमर्यादेत नागरिकांची कामे पार पाडण्यास प्राधान्य असावे, अशी अपेक्षा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक वुईके यांनी व्यक्त केली.

१ ते ७ ऑगस्ट दरम्यान जिल्ह्यात साजरा होणाऱ्या महसूल सप्ताहानिमित्त दिलेल्या शुभेच्छा पत्रात पालकमंत्री डॉ. वुईके म्हणाले, महसूल विभाग प्रशासकीय यंत्रणेचा केंद्रबिंदू म्हणून ओळखला जातो. शासनाच्या विविध योजना, धोरणे, आदेश आणि कामकाजाची प्रभावी अंमलबजावणी करणे ही महसूल विभागाची जबाबदारी आहे. 'गाव ते राजधानी' असा व्यापक कार्यक्षेत्र असलेला हा विभाग शासन आणि जनतेमधील एक दुवा म्हणून कार्य करतो. बऱ्याच वेळा 'महसूल' या शब्दाचा अर्थ फक्त आर्थिक उत्पन्नाशी जोडला जातो. पण, प्रत्यक्षात हा विभाग जमिनीचे अधिकार अभिलेख अद्यावतीकरण, फेरफार



नोंदणी, शेतपिक नुकसानीचे पंचनामे, सामाजिक अर्थसहाय्य योजना, नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन व निवडणुका अशा असंख्य कार्यामध्ये अहोरात्र सहभागी असतो. खऱ्या अर्थाने महसूल विभाग शासनाच्या यंत्रणेचा कणा आहे.

गेल्या काही वर्षांत महसूल विभागाने डिजिटायझेशन, ऑनलाईन सेवा, ई-सातबारा, ई-फेरफार, मोबाईल ॲप्स, नागरिक सेवा केंद्रे याद्वारे एक सुलभ, पारदर्शक आणि तत्पर सेवा देण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. यामुळे नागरिकांना सरकारी कार्यालयात चकरा माराव्या लागत नाहीत, हे एक सकारात्मक परिवर्तन आहे.

चंद्रपूर जिल्ह्यामध्ये वने मोठ्या प्रमाणात असल्यामुळे वनविभाग आणि महसूल विभाग यांच्यातील योग्य समन्वय असल्याने, वनहक्क प्रकरणे, निर्वाणीकरण, झुडपी जमिनीचे रूपांतरण, वनीकरणासाठी लागणारी जमीन, यामुळे अनेक विकासकामे प्रगतीपथावर आहेत. यासंबंधी महसूल विभागाची भूमिका निर्णायक ठरते. तसेच चंद्रपूर जिल्हयात मोठ्या प्रमाणात वन जमीन असल्याने येथील पारंपरिक आदिवासी समुदायाला वनहक्क दावे मंजुर करुन, त्यांच्या हक्काची जमीन कसण्याकरिता, उपलब्ध करून देण्यात आली. यामुळे पिढयानपिढ्या दुर्लक्षित असलेला आदिवासी समुदाय हा विकासाच्या मुख्या प्रवाहात आला आहेत.

महसूल विभागाच्या माध्यमातूनच शासनाच्या विविध योजना समाजाच्या शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचतात. म्हणून महसूल विभागाचा सन्मान, त्याचे कार्य ओळखणे, आणि ते अधिक प्रभावीपणे घडवणे ही आपली सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. चंद्रपूर जिल्हयातील पाणंद रस्ता योजना, चॅटबोट, शस्त्र परवाना ॲप, इत्यादी उपक्रम राज्यस्तरावर अग्रस्थानी ठरले. या विभागातील कर्मचारी व अधिकारी वर्गाने प्रामाणीकपणे कार्य केल्यामुळे चंद्रपूर जिल्हा लोकाभिमुख प्रशासनाचा उत्कृष्ठ नमुना बनला आहे. त्याचेच फलीत म्हणून महाराष्ट्र शासनाच्या १०० दिवसाच्या अभियानामध्ये चंद्रपूर जिल्हा अव्वल स्थानी राहिलेला आहे.

महसूल विभागाच्या माध्यमातुन आपण 'शासन आपल्या दारी' हे तत्व प्रत्यक्षात उतरवित आहोत. यापुढेही महाराष्ट्र शासनामार्फत राबविण्यात येणा-या विविध योजनांच्या अंमलबजाणी करिता जिल्ह्यातील महसूल विभाग महत्वाची भूमिका बजावेल, अशी अपेक्षा पालकमंत्री डॉ. वुईके यांनी व्यक्त केली.

# हिंगोली जिल्ह्याच्या विकासकामांसाठी भरघोस निधी - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

हिंगोली, दि. ४ (जिमाका) : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील राज्य शासन हिंगोली जिल्ह्याच्या विकास कामांसाठी भरघोस निधी पुरवठा करत असून, गोरगरीब, शेतकरी, कष्टकरी यांच्यासाठी अहोरात्र झटत असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कावड यात्रेच्या समारोप कार्यक्रमात केले.

सर्वसामान्य लोकांसाठी काम करणारे शासन सत्तेत आल्यानंतर मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, शेतकऱ्यांसाठी मुख्यमंत्री नमो शेतकरी सन्मान निधी योजना, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण यासह विविध योजना राबविण्यात येत असून, निधीअभावी या योजना बंद पडणार नसल्याची ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे दिली.

हिंगोली येथील कावड यात्रा महोत्सव समितीच्यावतीने यात्रेचा समारोपीय कार्यक्रम गांधी चौकात आयोजित



करण्यात आला होता. त्यावेळी उपमुख्यमंत्री श्री. शिंदे बोलत होते.

व्यासपीठावर आमदार हेमंत पाटील, आमदार संतोष बांगर, आमदार बाबुराव कदम- कोहळीकर, माजी खासदार सुभाष वानखेडे उपस्थित होते.

आमदार संतोष बांगर हे २०१६ पासून कावड यात्रेचे आयोजन करत असून, गेल्या तीन वर्षांपासून येथे येत असल्याचे सांगून दरवर्षी या यात्रेला शिवभक्तांची हजेरी वाढत असल्याचे उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले. गेल्या अडीच वर्षात जिल्ह्याच्या विविध विकासकामांसाठी आपण २६०० कोटी रुपयांचा भरघोस निधी दिल्याचे सांगून भविष्यातही हा निधी कमी पडू देणार नसल्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयासमोर विविध मागण्यांसाठी उपोषण करत असलेल्या आदिवासी बांधवांनी उपोषण मागे घेण्याचे आवाहन त्यांनी केले. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये त्यांच्या मागण्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर मांडून त्या सोडविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

संतांच्या भूमीत ही कावड यात्रा २०१६ पासून सुरू असून, आता ती हिंगोलीपुरती सीमित राहिली नसल्याचे त्यांनी सांगितले. या यात्रेत संस्कृती, परंपरा धर्म वाढविण्याचे काम आमदार बांगर करत असल्याचे ते म्हणाले. ही यात्रा आध्यात्मिक परंपरेचे प्रतिक असून, त्याग, समर्पण, एकजुटीचे दर्शन घडवत असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी म्हणाले.

तसेच ऑपरेशन सिंदूर यशस्वीरित्या राबविल्याबाबत त्यांनी देशाच्या जवानांचे कौतुक केले.

आमदार संतोष बांगर यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा शाल व शिवमूर्ती भेट देऊन स्वागत केले.

## खनिज उत्खनन क्षेत्रात महाराष्ट्र आणि दक्षिण आफ्रिका याच्यात व्यापार वृद्धीच्या संधी - मंत्री जयकुमार रावल

मुंबई, : महात्मा गांधी यांच्या दक्षिण आफ्रिकेतील वास्तव्यापासून महाराष्ट्र आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात ऐतिहासिक संबंध आहेत. हे संबंध व्यापारवृद्धीच्या माध्यमातून अधिक दृढ करण्यास महाराष्ट्र उत्सुक असून खनिज उत्खनन क्षेत्रात व्यापारवृद्धीच्या मोठ्या संधी आहेत, असे राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी सांगितले. दक्षिण आफ्रिकेचे महावाणिज्यदूत गिडीयन लबाने यांनी आज महाराष्ट्राचे राजशिष्टाचार मंत्री रावल यांची सह्याद्री अतिथीगृह येथे सदिच्छा भेट घेतली. यावेळी दोघांनी व्यापारवृद्धीच्या क्षेत्रांबाबत औपचारिक चर्चा करण्यात आली.

मंत्री रावल म्हणाले, भारत आणि दक्षिण आफ्रिका हे दोन्ही देश विकासाच्या वाटेवर आहेत. महाराष्ट्र हे भारताचे पॉवर हाऊस आहे. येथे पर्यटनाबरोबरच विविध क्षेत्रात विकासाच्या संधी आहेत. खनिज उत्खनन, विविध उत्पादने आदी क्षेत्रे निश्र्चित करुन महाराष्ट्र आणि दक्षिण आफ्रिका यांच्यादरम्यान व्यापार वृद्धी शक्य आहे. याच माध्यमातून दोघांमधील ऐतिहासिक संबंध अधिक वृद्धींगत होतील, असा विश्र्वास त्यांनी व्यक्त केला. महाराष्ट्राला दक्षिण आफ्रिकेविषयी नेहमीच आत्मियता राहिली असल्याचे यावेळी मंत्री रावल यांनी सांगितले दक्षिण आफ्रिकेचे महावाणिज्यदूत गिडीयन लबाने यांनी महात्मा गांधी यांनी दक्षिण आफ्रिकेतील वास्तव्यादरम्यान केलेल्या कार्यापासून प्रेरणा घेऊन नेल्सन मंडेला यांनी दक्षिण आफ्रिकेच्या स्वातंत्र्य आणि विकासामध्ये मोलाची भूमिका बजावल्याचे सांगितले. भारत हे कृषी उत्पादन क्षेत्रात चांगले कार्य करीत असून दक्षिण आफ्रिकेला मदतीची अपेक्षा असल्याचे त्यांनी सांगितले.

# 'कॉटन टू क्लॉथ'च्या माध्यमातून महाराष्ट्र आणि दक्षिण कोरिया यांच्यात वस्त्रोद्योग क्षेत्रात व्यापारवृद्धीची संधी - मंत्री जयकुमार रावल

मुंबई, : महाराष्ट्र आणि दक्षिण कोरिया दरम्यान वस्त्रोद्योग क्षेत्रात व्यापारवृद्धीची मोठी संधी आहे. महाराष्ट्रातील कापूस आणि दक्षिण कोरियातील टेक्स्टाईल मशिनरी यांच्या माध्यमातून भागिदारीने परस्पर संबंध अधिक वृद्धींगत होतील, असा विश्र्वास राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी व्यक्त केला.



दक्षिण कोरियाचे महावाणिज्यदूत डोंगवान यू यांनी मंत्री रावल यांची सह्याद्री अतिथीगृह येथे सदिच्छा भेट घेतली. यावेळी महाराष्ट्र आणि कोरिया दरम्यान व्यापारवृद्धीच्या विविध संधींवर चर्चा करण्यात आली.

मंत्री रावल म्हणाले, महाराष्ट्र हे भारताचे पॉवर हाऊस आहे. उत्पादन क्षेत्रात तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्यावर भर देऊन महाराष्ट्र आणि कोरियादरम्यान व्यापारवृद्धीच्या संधी निश्र्चित करण्यावर भर देणे गरजेचे आहे. महाराष्ट्रात कुशल मनुष्यबळ उपलब्ध असल्याने महाराष्ट्र आणि कोरियामध्ये गुंतवणूक आणि व्यापाराच्या विविध संधी विचारात घेऊन इच्छुकांना प्रोत्साहन देता येईल. विशेषत: महाराष्ट्रातील कापूस आणि कोरियातील टेक्स्टाईल मशिनरी यांच्या माध्यमातून भागिदारीने व्यापार करुन परस्पर संबंध वृद्धींगत होतील, असा विश्र्वास मंत्री रावल यांनी व्यक्त केला.

महाराष्ट्रात मुंबई-पुण्याबरोबरच विविध जिल्ह्यांमध्ये उद्योजकांना सोयी सुविधा उपलब्ध करुन दिल्या जात आहेत. महाराष्ट्र ग्रो प्रोसेसिंग बरोबरच फळे, भाजीपाला निर्यातीत अग्रेसर असून कोरियाच्या उद्योजकांचे राज्यात स्वागतच केले जाईल, असेही मंत्री रावल यांनी यावेळी सांगितले.

कोरियन महावाणिज्यदूत डोंगवान यू यांनी व्यापार आणि गुंतवणुकीच्या दृष्टीने महाराष्ट्र हे भारतातील महत्त्वाचे राज्य असल्याचे सांगितले. मुंबई-पुणे परिसरात विविध उत्पादनांच्या अनेक कोरियन कंपन्या असल्याचे सांगून येत्या १२ ऑक्टोबर रोजी मुंबईत होणाऱ्या कोरियन महोत्सवासाठी त्यांनी मंत्री रावल यांना निमंत्रण दिले.

# 'महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धे'साठी ३१ ऑगस्टपर्यंत ऑनलाईन प्रवेशिका उपलब्ध

मुंबई, : महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने ३ नोव्हेंबर, २०२५ पासून सुरु होणाऱ्या हौशी मराठी, हिंदी, संगीत व संस्कृत राज्य नाट्य स्पर्धांसाठी तसेच बालनाट्य स्पर्धा व दिव्यांग बालनाट्य स्पर्धांसाठी नाट्य संस्थांकडून १ ते ३१ ऑगस्ट, २०२५ या कालावधीत ऑनलाईन प्रवेशिका मागविण्यात येत असल्याची माहिती सांस्कृतिक कार्य संचालक विभीषण चवरे यांनी दिली. सांस्कृतिक कार्य मंत्री ड.आशिष शेलार व सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य नाट्य स्पर्धा पार पडणार असल्याचे चवरे यांनी नमूद केले आहे.

२२ व्या महाराष्ट्र राज्य बालनाट्य स्पर्धेची प्राथमिक फेरी डिसेंबर, २०२५ पासून विविध १० केंद्रांवर तर ६४ व्या हौशी हिंदी, संगीत व संस्कृत नाट्य स्पर्धेची अंतिम फेरी प्रत्येकी एका केंद्रावर डिसेंबर, २०२५ पासून आयोजित करण्यात येणार आहे.

नोंदणीकृत हौशी नाट्य संस्थांना तसेच गतवर्षी राज्यनाट्य स्पर्धेत सहभागी झालेल्या नाट्य संस्थांना स्पर्धेसाठी विहित नमुन्यातील प्रवेशिका, नियम संचालनालयाच्या https://mahanatyaspardha.com या संकेतस्थळावर ऑनलाईन उपलब्ध होतील. आवश्यक त्या कागदपत्रांसह प्रवेशिका ३१ ऑगस्ट, २०२५ पर्यंत ऑनलाईन सादर कराव्यात.

विहित मुदतीनंतर कोणत्याही परिस्थितीत प्रवेशिका स्वीकारल्या जाणार नाहीत. प्रवेशिकेसोबत आवश्यक कागदपत्रे जोडली नसल्यास किंवा संपूर्ण तपशील भरला नसल्यास ऑनलाईन प्रवेशिका भरता येणार नाही.

स्पर्धेसाठी संस्थेची निवड झाल्यानंतर संस्थेने शासनाने निश्र्चित केलेल्या केंद्रावर व दिलेल्या तारखेस प्रयोग सादर केला नाही, तर त्यांची प्रवेशिकेसोबत भरलेली अनामत रक्कम शासकीय कोषागारात जमा करण्यात येईल. नाट्यस्पर्धेकरिता संस्थांना शासन नियम बंधनकारक राहतील. नियमांचे उल्लंघन केल्यास संस्थेला अपात्र ठरविण्यात येईल.

राज्यातील अधिकाधिक नाट्य संस्थांनी महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धेत आपला सहभाग नोंदवावा, असे आवाहन चवरे यांनी केले आहे.

# बांधकाम कामगारांच्या कल्याणासाठी विश्वकर्मा बांधकाम कामगार आरोग्य सेवा योजना

बांधकाम कामगारांची नित्य आरोग्य तपासणी होण्याच्या दृष्टीने विश्वकर्मा बांधकाम कामगार आरोग्य सेवा या राज्यस्तरीय योजनेचा काल पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. या पार्श्वभूमिवर या योजनेची माहिती देणारा लेखष्ठ

बहुतेक बांधकाम कामगार हे निरोगी आणि सुरक्षित कार्यपद्धतीबद्दल जागृत पूर्णपणे जागरूक नसतात, त्यांना कार्य–संबंधित जोखीम व इतर विविध भौतिक, रासायनिक, जैविक जोखीम आणि मानसिक–सामाजिक घटक अशा विविध गोष्टींचा सामना करावा लागतो. त्याकारणाने अनेक बांधकाम कामगार हे त्रस्त आहेत. त्यांना अनेक विकारांचा सामना करावा लागतो, जसे की मस्क्यूकोस्केलेटल विकार, कमी ऐकू येणे, हातात कंपन जाणवणे, त्वचा आणि श्वसन रोग इत्यादी. या सर्वांवर प्रतिबंधात्म क उपाय म्हणून त्यांनी नित्य नियमाने आरोग्य तपासणी करणे गरजेचे आहे. असे केल्यास त्यांना अशा प्रकारच्या विविध आजारापासून दूर राहता येईल किंवा अशा प्रकारचे काही जुनाट आजार असल्यास त्यावर त्वरित उपचार करता येतील व त्यांचे स्वास्थ चांगले राहील. त्यांची कार्यक्षमता वाढेल व त्यांना त्यांची रोजगार क्षमता वाढण्यास मदत होईल. एकंदरीत त्यांना सुरक्षित, निरोगी आणि समृद्ध जीवन जगता येईल.

बांधकाम व्यवसायामधील कामगारांच्या हिताचे रक्षण करण्याच्या दृष्टीने त्यांची नियमित आरोग्य तपासणी व्हावी व त्यांना त्वरित उपचार मिळावेत, याकरिता महाराष्ट्र शासनाकडून ही योजना राबविण्यात येत आहे. त्यांच्या आरोग्याच्या वेळोवेळी तपासण्या झाल्यास भविष्यात उद्भवणाऱ्या आरोग्याच्या समस्यांवर प्राथमिक स्तरावर उपचार करणे शक्य होणार आहे. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ अंतर्गत नोंदित सक्रिय (जीवित) बांधकाम कामगार यांच्याकरिता ही योजना असून, याअंतर्गत तपासणी ते उपचार अशी सेवा प्रदान करण्यात येणार आहे. प्रतिबंधात्मक आरोग्य तपासणी, रोगाचे त्वरित निदान, वैद्यकीय उपचारांसाठी सुलभ प्रवेश, कामाच्या ठिकाणी कार्यक्षमता वाढवण्यास मदत, आरोग्य सेवा आपल्या दारी असे या योजनेचे प्रमुख फायदे आहेत.

योजनेचे लाभार्थी

या योजनेअंतर्गत सर्व नोंदित सक्रिय (जिवित) बांधकाम कामगार तसेच, त्यांच्या कुटुंबामधील पती अथवा पत्नी व १० वर्षावरील प्रथम दोन अपत्ये ही लाभार्थी म्हणून गणण्यात येतील. या योजनेअंतर्गत बांधकाम कामगारांच्या सक्रिय (जिवित) नोंदणी कालावधीमध्ये वर्षातून एकदा या योजनेच्या लाभासाठी लाभार्थी पात्र राहील. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक २८ जुलै २०२३ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार नोंदीत सक्रिय (जिवित) बांधकाम कामगार अथवा त्याच्या कुटुंबातील पात्र व्यक्तींनी आरोग्य योजनेचा लाभ घेतला असल्यास त्यांना शासकीय योजनेची द्विरुक्ती टाळण्यासाठी या योजनेचा लाभ मिळणार नाही. मात्र, त्या बांधकाम कामगाराचा अथवा कुटुंबातील पात्र लाभार्थ्यांच्या उपचारावरील खर्च ५ लाख रूपयापेक्षा अधिक होणार असल्यास या योजनेच्या खर्चाच्या मर्यादेत नियुक्त संस्थेने महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या सहमतीने सूचीबद्ध केलेल्या रुग्णालयांमार्फत उपचाराकरीता लाभार्थी पात्र राहील. ही योजना मंडळाकडे नोंदित सक्रिय (जिवित) बांधकाम कामगारांकरीता ऐच्छिक स्वरूपाची राहील.

ही योजना प्राथमिक आरोग्य तपासणी चाचणी, प्रगत पुष्टीकरण आरोग्य तपासणी चाचणी व वैद्यकीय उपचार या तीन टप्प्यामध्ये राबविण्यात येईल.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत नोंदित सक्रिय (जिवित) बांधकाम कामगार यांच्याकरीता ''तपासणी ते उपचार आरोग्य योजना'' राबविण्याकरीता एच.एल. एल. लाईफकेअर. लि. (भारत सरकार उद्योग) यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

अपघातप्रकरणी वैद्यकीय सहाय्य

बांधकामाच्या ठिकाणी नोंदित सक्रिय (जिवित) बांधकाम कामगारास अपघात झाल्यास ती व्यक्ती या योजनेंतर्गत उपचारास पात्र राहील. बांधकाम कामगारास आवश्यकतेनुसार व सोईनुसार ज्या रूग्णालयामध्ये उपचाराकरीता भरती केले असेल, असे रूग्णालय खाजगी असल्यास तात्पुरत्या स्वरूपात सूचीबद्ध करून पुढील उपचार नियुक्त संस्था करेल. अपघातानंतर उपचाराकरीता असलेल्या रुग्णालयांची माहिती लाभार्थी कामाची आस्थापना नातेवाईक इतर व्यक्तींनी नियुक्त संस्थेस टोल फ्री क्रमांकावर अथवा जिल्हा तालुका कामगार सुविधा केंद्रास देणे आवश्यक राहील.

सूचीबद्ध रुग्णालये

नियुक्त संस्थेने प्रत्येक तालुक्यात किमान एक याप्रमाणे निश्चित ठिकाणी कायमस्वरूपी आरोग्य तपासणी केंद्रे निर्माण किंवा सूचीबध्द केलेल्या ठिकाणी लाभार्थी भेट देवून प्राथमिक आरोग्य तपासणी करू शकेल व तपासणी अहवाल (प्राथमिक व प्रगत पुष्टीकरण) मिळवू शकेल. पृष्टीकरण आरोग्य तपासणी चाचणी तसेच, वैद्यकीय उपचाराकरीता नियुक्त संस्था रूग्णालये सूचीबध्द करतील. प्रत्येक जिल्हा कामगार सुविधा केंद्राच्या क्षेत्रामध्ये किमान तीन रूग्णालये मंडळाच्या मान्यतेने सूचीबध्द करून आवश्यकतेनुसार यामध्ये वाढ करण्यात येईल.

फिरते वैद्यकीय कक्ष

फिरते वैद्यकीय कक्ष नियुक्त संस्थेमार्फत प्रत्येक जिल्हा कामगार सुविधा केंद्राच्या क्षेत्रामध्ये २४ द ७ कार्यरत राहील. या कक्षावरील होणारा खर्च नियुक्त संस्थेमार्फत करण्यात येईल. नियुक्त संस्थेमार्फत फिरते वैद्यकीय कक्ष वाहन विनाशुल्क उपलब्ध करून देणे आवश्यक राहील. या फिरते वैद्यकीय कक्ष वाहनामध्ये डॉक्टर, परिचारक व मदतनीस उपलब्ध राहतील. हे फिरते वैद्यकीय कक्ष वाहन अत्याधुनिक जीवन समर्थन प्रणालीयुक्त असून यामध्ये लाभार्थ्यांना द्यावयाची औषधे, आपत्कालीन परिस्थितीमध्ये लागणारी अत्यावश्यक औषधे, प्रथमोपचार इ. सुविधा देण्यात येतील. हे फिरते वैद्यकीय कक्ष वाहन हे या योजनेकरीता तयार केलेल्या समर्पित बांधकाम कामगार आरोग्य क्रमांकाशी संलग्न राहील.

या योजनेचा नि:शुल्क टोल फ्री क्रमांक १८००–२–६६ ६६ ६६ ६६ हा असून यावर कामगारांना संपर्क साधता येईल. अधिक माहितीसाठी जिल्ह्याच्या सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयाशी संपर्क साधावा.

**संकलन – जिल्हा माहिती कार्यालय, सांगली**

# दोषी पोलीस कर्मचाऱ्यांवर अ‍ॅक्ट्रोसिटीचा गुन्हा दाखल करा! बसप महासचिव डॉ.हुलगेश चलवादींची मागणी

पुणे:– विद्येचे माहेरघर असलेल्या 'सावित्रीमाई'च्या पुण्यात महिलांच्या सुरक्षिततेच्या प्रश्न्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.पोलीस कर्मचाऱ्यांकडूनच मानसिक,शारिरिक त्रास मिळत असेल तर पीडितांनी कुणाकडे दाद मागायची? असा सवाल बहुजन समाज पक्षाने उपस्थित केला आहे. सध्या गाजत असलेले 'कोथरूड पोलीस स्टेशन' प्रकरणामुळे पोलीस दलाची प्रतिमा मलीन झाली आहे. पीडित तरुणींना मारहाण करीत जातीवाचक शब्द वापरणाऱ्या पोलिसांवर अ‍ॅक्ट्रोसिटीचा गुन्हा दाखल करा, अशी मागणी बसपचे प्रदेश महासचिव,पश्रि्चम महाराष्ट्र झोन मुख्य प्रभारी,माजी नगरसेवक डॉ.हुलगेश चलवादी यांनी सोमवारी (ता.४) केली. दोषींवर गुन्हा दाखल केला नाही, तर तीव्र आंदोलन करू, असा इशारा देखील डॉ.चलवादींनी दिला.

पोलीस कोठडीत झालेला सोमनाथ सूर्यवंशी मृत्यू प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारला दणका दिला आहे.हे प्रकरण पोलीस यंत्रणेच्या कार्यप्रणाली वर प्रश्न्न निर्माण करणारे आहे. असे असतांना कोथरूड पोलीस स्टेशन आणि पोलीस कर्मचाऱ्यांवर तरुणींकडून आरोप होत असतील तर ही बाब गांभीर्याने घेणे आवश्यक आहे. पोलिसांकडून कुठलेही वॉरंट नसतांना तरुणींच्या घरात प्रवेश करणे, त्यांच्या बेडरूमसह बाथरूमची तपासणी करणे तसेच त्यांच्यासोबत खालच्या स्तरावर बोलणे असे प्रकार पुरोगामी महाराष्ट्रात घडत असतील तर बसपा गप्प बसणार नाही.पुणे पोलीस आयुक्तांनी याप्रकरणात तात्काळ कारवाई करीत दोषींवर गुन्हा दाखल करावा, अशी मागणी डॉ.चलवादी यांनी केली.

पीडितांनी सहायक पोलीस निरीक्षक प्रेमा पाटील, संभाजीनगर पोलीस स्टेशनचे अमोल कामटे आणि छत्रपती संभाजीनगर येथील महिला कॉन्स्टेबल संजीवनी शिंदे यांच्यावर मारहाण केल्याचा आरोप केला आहे.या आरोपांची सखोल चौकशी करीत दोषींवर अ‍ॅक्ट्रोसिटीचा गुन्हा दाखल करा,अन्यथा तीव्र आंदोलन करू असा इशारा बसपने दिला आहे.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील २३ वर्षीय विवाहित महिला आपल्या पतीकडून होणाऱ्या सततच्या मानसिक, शारीरिक त्रासाला कंटाळून पुण्यात आली होती. त्या मुलीला मदत केलेल्या तीन मुलींना स्थानिक पोलिसांनी कुठलीही पूर्वसूचना न देता ताब्यात घेत पोलीस स्टेशनमध्ये जातीवाचक शिवीगाळ, मारहाण,लैंगिक अपमान केल्याचा आरोप पीडितांनी केला आहे. राज्य महिला आयोगाने देखील याप्रकरणाची दखल घेत तात्काळ कारवाईचे निर्देश द्यावे, अशी मागणी डॉ. चलवादींनी केली आहे.

# प्रधानमंत्री पीक विमा योजनेत सहभागी होण्यासाठी मुदतवाढ

लातूर, : खरीप हंगाम २०२५ साठी प्रधानमंत्री पीक विमा योजना राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये राबविली जात आहे. या योजनेत सहभागी होण्याची अंतिम मुदत ३१ जुलै २०२५ होती. परंतु, लातूर जिल्ह्यात कमी सहभाग, ग्रिस्टॅक फार्मर आयडीची कमतरता, पीएमएफबीवाय पोर्टल आणि आधार (युआयडी) तसेच सीएससी सर्व्हरमधील तांत्रिक अडचणी आणि भूमी अभिलेख पोर्टलच्या समस्यांमुळे शेतकऱ्यांच्या सहभागावर परिणाम झाला आहे.

यामुळे केंद्र शासनाने विशेष बाब म्हणून बिगर कर्जदार शेतकऱ्यांसाठी १४ ऑगस्ट २०२५ आणि कर्जदार शेतकऱ्यांसाठी ३० ऑगस्ट २०२५ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. तरी सर्व शेतकऱ्यांनी https://pmfby.gov.in या पोर्टलवर स्वतः, तसेच बँक, विमा कंपनीचे एजेंट, क्रॉप इन्शुरन्स अ‍ॅप किंवा सामुदायिक सेवा केंद्र (सीएससी) मार्फत योजनेत सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी शिवसांब लाडके यांनी केले आहे.

# लातूर होतंय स्वच्छ आणि वाचन संस्कृतीलाही मिळतेय चालना - अजित पाटील कव्हेकर

लातूर : लातूर शहर भाजपा शिष्टमंडळाने लातूरकरांच्या हितासाठी मनपा आयुक्त मानसी मीना यांना मुलभूत सुविधांबाबत निवेदन दिले होते. तसेच शहरातील कचरा समस्येबाबत व्यथा मांडून याबाबत आयुक्तांसोबत चर्चा केली होती. यानंतर लातूरकरांच्या विविध प्रश्न्नांबाबत शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व पालकमंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्यासोबत चर्चा केलेली होती. भाजपाने दिलेल्या या निवेदनाची दखल घेत व पालकमंत्र्यांकडून केलेल्या सुचनेमुळे मनपाने शहरात स्वच्छता मोहिमेला गती दिलेली आहे. तसेच विविध ठिकाणी असलेले कचऱ्याचे ढिगारे हटवत त्याठिकाणी वाचनकट्टे सुरु केलेले आहेत. शहर भाजपाने दिलेल्या निवेदनामुळे लातूर आता स्वच्छ होत असून वाचन संस्कृतीलाही चालना मिळू लागली असल्याचे शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी सांगितले आहे. शहरातील विविध समस्यांबाबत लातूर शहर भाजपा शिष्टमंडळाच्या वतीने मनपा आयुक्त मानसी मीना यांना निवेदन दिलेले होते.

# जागतिक स्तनपान सप्ताह ग्रामीण रुग्णालय भोकर येथे साजरा

भोकर /प्रतिनीधी / दरवर्षी जागतिक स्तनपान सप्ताह दि. १ ते ६ ऑगस्ट २०२५ या कालावधीत राबविण्यात येत आहे. जिल्हाधिकारी नांदेड राहुल कर्डीले, मुख्य कार्यकारी अधिकारी नांदेड मेघना कावली , जिल्हा शल्य चिकित्सक नांदेड डॉ संजय पेरके, जिल्हा आरोग्य अधिकारी नांदेड डॉ. संगीता देशमुख,निवासी वैद्यकीय अधिकारी नांदेड डॉ. राजाभाऊ बुट्टे ,नोडल अधिकारी डॉ. हनुमंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व वैद्यकीय अधिक्षक ग्रामीण रुग्णालय भोकर डॉ. प्रताप चव्हाण यांच्या नियोजनानुसार भोकर ग्रामीण रुग्णालयात जागतिक स्तनपान सप्ताह साजरा करण्यात आला.



आई आणि बालकाच्या आरोग्यासाठी स्तनपानाचे महत्व अधोरेखित करणे हा या सप्ताहाचा मुख्य उद्देश आहे.

जागतिक आरोग्य संघटना (थकज) आणि युनिसेफ (णछखउएऋ) यांनी शिफारस केल्यानुसार, जन्मानंतर पहिल्या तासात स्तनपान सुरू करणे आणि पहिले सहा महिने केवळ स्तनपान करणे बालकाच्या सर्वांगीण वाढीसाठी आणि विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यानंतर, दोन वर्षांपर्यंत किंवा त्याहून अधिक काळ पूरक आहारासोबत स्तनपान सुरू ठेवण्याचा सल्ला दिला जातो.

स्तनपानाचे फायदे केवळ बालकापुरते मर्यादित नाहीत, तर ते मातेसाठीही तितकेच महत्त्वाचे आहेत. स्तनपानामुळे मातेमध्ये प्रसूतीनंतर होणारा रक्तस्राव कमी होतो, गर्भाशयाला मूळ स्थितीत येण्यास मदत होते आणि काही विशिष्ट कर्करोगाचा धोका कमी होतो. बालकांसाठी, स्तनपान हे रोगप्रतिकारशक्ती वाढवते, संसर्गापासून संरक्षण देते, कुपोषण आणि अतिसाराचा धोका कमी करते.

जागतिक स्तनपान सप्ताह बाबत स्त्रीरोग तज्ञ डॉ. सविता कांबळे यांनी स्तनदा मातांना स्तनपान ची योग्य पद्धत व स्तनपानचे महत्व सांगून तसेच गरोदर मातांना योग्य आहारा बद्दल उपस्थित मातांना विस्तृत माहिती दिली. यावेळी श्रीमती राजश्री ब्राम्हणे इन्चार्ज सिस्टर, आरोग्य निरीक्षक सत्यजीत टिप्रेसवार, आरोग्य सेविका श्रीमती सरस्वती दिवटे, मुक्ता गुट्टे, संगीता पंदीलवाड,आरोग्य कर्मचारी नामदेव कंधारे, योगेश पवार, स्तनदा माता व गरोदर माता मोठया संखेने उपस्थित होत्या.

# लातूर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या वाटचालीत विविध कार्यकारी संस्थांचे मोठे योगदान

लातूर :– देशभरात लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा गौरव केला जातो. यामध्ये लातूर जिल्ह्यातील विविध कार्यकारी सोसायट्यांचे योगदान लाख मोलाचे असल्याचे गौरउदगार माजी आमदार तथा लातूर जिल्हा बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांनी काढले.



दि महाराष्ट्र बँक्स असोसिएशन द्वारा दिला जाणारा कै.वेकूंठभाई मेहता उत्कृष्ट बँक पुरस्कार व सहकार क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल धिरज विलासराव देशमुख यांना पुरस्कार प्राप्त झाला या बद्दल औसा तालुक्यातील विविध कार्यकारी संस्था चेअरमन यांच्या वतीने आयोजित सत्कार कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी जिल्हा बँक संचालिका स्वयंप्रभा पाटील,माजी जिप सदस्य नारायण लोखंडे,संत शिरोमणी कारखाना चेअरमन शाम भोसले,व्हा चेअरमन सचिन पाटील,माजी चेअरमन गणपतराव बाजूळगे, जिल्हा बँक उपाध्यक्ष प्रमोद जाधव,मांजरा कारखाना व्हा चेअरमन अशोकराव काळे,रेणा कारखाना व्हा चेअरमन प्रविण पाटील, सदाशिव कदम,बाबासाहेब गायकवाड,पृथ्वीराज सिरसाठ,रघुनाथ शिंदे, आदींची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना माजी आमदार धिरज विलासराव देशमुख म्हणाले की, लातूर जिल्हा बँक ही आपल्या जिल्ह्यातील शेतक–यांचा मोठा आधार असून शेतकरी आहे म्हणून देश आहे त्यामुळे शेतकरी हिताचे अनेक निर्णय घेवून ते यशस्वी पणे राबवले त्यामुळे आपल्या भागातील शेतक–यांच्या जिवनात आर्थिक परिवर्तन घडले आहे असे त्यांनी सांगितले.

यावेळी सर्व विविध कार्यकारी सोसायटी चेअरमन व सदस्यांनी माजी आमदार धिरज विलासराव देशमुख यांचा सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमासा विविध संस्था चेअरमन दत्तकुमार शिंदे,वाघंबर कांबळे,गोरख सावंत,दिनकर मेढकर,गुणवंत कदम,धनराज साळुंखे,दिलीप पाटील,अशोक जंगाले,गुणवंत करडे,पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राशी भविष्य ०५ ऑगस्ट २०२५

मेष : शुभ रंग–पांढरा, शुभ दिशा– उत्तर

अचानक लाभ होण्याचे योग आहेत. दूरदर्शीपणामुळे प्रत्येक कामात यश मिळेल. आरोग्याकडे लक्ष द्या. कौटुंबिक समस्या दूर होतील. प्रवास सुखकारक राहील.

वृषभ : शुभ रंग–गुलाबी, शुभ दिशा–उत्तर

प्रतिष्ठीत लोकांच्या सहकार्याने आपले कामे सुरळीत पार पडतील. अनावश्यक खरेदी कराल. जीवनसाथीशी मतभेद होऊ शकतात. व्यापारात नवीन संकल्पना आमलात आणण्याचा विचार कराल.

मिथुन : शुभ रंग– लाल, शुभ दिशा–पश्चिम

लोकांशी संबंध वाढवून आपल्या योजना पूर्ण करू शकाल. व्यापार अनकूल राहील. दुसऱ्याच्या कामात हस्तक्षेप करू नका. अडकलेला पैसा मिळेल.

कर्क : शुभ रंग–पांढरा, शुभ दिशा–उत्तर

स्वत:च्या सामर्थ्यामुळे यश मिळेल. दुसऱ्यावर विश्वास ठेवू नका. वहान खरेदीचे योग आहेत. व्यापारात नवीन प्रस्ताव समोर येतील. दांपत्य जीवन चांगले राहील.

सिंह : शुभ रंग– पांढरा, शुभ दिशा–पश्चिम

स्वाभिमान व अहंकरात अंतर ठेवण्याचा प्रयत्न करा. कोणाच्यातरी बोलण्यामुळे मनात शंका निर्माण होतील. व्यापारात नुकसान होण्याची शक्यता आहे. मुलांची काळजी राहील.

कन्या : शुभ रंग–पिवळा, शुभ दिशा– पश्चिम

धार्मिक, शुभा कार्यात सहभागी रहील्याने व्यस्त रहाल. वहान चालवितांना काळजी घ्या. सर्व कामे सुरळीत पार पडतील.

तुळ : शुभ रंग–पिवळा, शुभ दिशा–पश्चिम

बौद्धिक कार्यक्षमता वाढेल. करमणूक होईल. पत्नी सोबतचे संबध दृढ होतील. राजकारणातून फायदा होण्याची शक्यता. नवीन काम हाती घ्याल. कायद्याचे कामास उशीर करू नका.

वृश्चिक : शुभ रंग–गुलाबी, शुभ दिशा–दक्षिण

चैनीकडे मन झुकेल. रचनात्कम कार्यात प्रगती राहील. आपल्या बुद्धीचातुर्याचे कौतुक होईल. व्यापारीक निर्णय घेतांना उशीर करू नका.

धनु : शुभ रंग–क्रीम, शुभ दिशा–दक्षिण

आपल्या योजना यशस्वी होतील. जीवनसाथीच्या सहकार्याने कौटुंबिक समस्या दूर होतील. खर्चाला आळा घाला.

मकर : शुभ रंग– केसरी, शुभ दिशा–उत्तर

आजूबाजूचे वातावरण प्रतिकूल राहील. सामाजिक प्रतिष्ठा मिळणार नाही. मानसिक तणावामुळे कामात लक्ष लागणार नाही. आर्थिक तंगी राहील.

कुंभ : शुभ रंग–पांढरा, शुभ दिशा–पश्चिम

नौकरीमधील वेळ प्रसन्नपूर्वक जाईल. वाचनाची रूची वाढेल. मुलांच्या इच्छा पूर्ण होतील. उपयुक्त माहिती उपलब्ध होईल. नातेवाईकांशी मतभेद होण्याची शक्यता आहे.

मीन : शुभ रंग –पांढरा,शुभ दिशा–पश्चिम

आर्थिक सफलतेमुळे अहंकार वाढेल. लग्नाचे प्रस्ताव येतील. व्यापार व्यवसायात अचानक लाभ होण्याची शक्यता आहे. कौटुंबिक जीवन आनंदी राहील.

# उपदेशकथा वस्त्रे बदलली

एके दिवशी समुद्राच्या किनाऱ्यावर अध्यात्म आणि कर्मकांड यांची गाठ पडली. दोघे एकमेकांना म्हणाले, 'आपण समुद्रात स्नान करूया' त्याप्रमाणे दोघांनी आपआपले कपडे काढून ठेवले आणि मनसोक्त जलविहार केला. थोड्या वेळाने कर्मकांड किनाऱ्यावर आधी परत आले. नकळत त्याने अध्यात्माचे कपडे घातले आणि आपल्या मार्गाने ते निघून गेले. नंतर अध्यात्म समुद्रातून बाहेर आले. पाहते तर आपले कपडे दिसेनात. बरे, कपड्यांशिवाय कसे वावरायचे म्हणून कर्मकांडाचे कपडे घालून अध्यात्म आपल्या मार्गाने निघून गेले. या अदलाबदलीचा परिणाम असा झाला की, आजही समाजामध्ये कर्मकांडाला लोक अध्यात्म समजतात आणि अध्यात्म एक कर्मकांडच बनून गेले आहे पण काही थोडी माणसे अशी आढळतात की, वेषाकडे लक्ष न देता त्यांना अध्यात्माची ओळख बरोबर पटते.

कथा उपदेश : पाणी आणि दूध यातील फरक आपण जाणला पाहिजे.

# (गुरु वचन) सर्वोत्कृष्ट शाकाहार - लजपत राय सभरवाल

आपण सर्व जीवांना ईश्वराचा अंश मानतो म्हणून आपल्या धर्मग्रंथांमध्ये मांसाहार वर्ज्य करण्यास सांगितले आहे. महाभारतात भिष्म पितामह यांनी मांस खाणारा, मांस विकणारा व मांसासाठी जीवाची हत्या करणाऱ्यांना दोषी ठरवले आहे. म्हणून सर्व धर्मग्रंथांमध्ये शाकाहारच सर्वोत्कृष्ट आहार असल्याचे सांगितले आहे.

संत, महापुरुष यांनी सुद्धा सांगितले आहे की, शाकाहारामुळे आपले विचार सकारात्मक होतात तसेच दया व साहस गुण विकसित होतात.

विचारांवर प्रभाव

शाकाहारामुळे आपले विचार प्रभावित होतात. जर आपणास मन, वचन व कर्माने पवित्र व्हायचे असेल तर आपण शाकाहार म्हणजे फळ–भाज्यांचा पूर्ण आहारच घ्यायला हवा. खरंतर, बहुतांश मानवी मनाच्या एका कोपऱ्यात पशु व्यवहार दडलेला असतो. जर आपणास त्या पशुत्वातून मुक्त व्हायचे असेल तर मांसाहार सोडायलाच पाहिजे.

आपण फक्त जीभेचे चोचले पुरवण्यासाठी दुसऱ्या जीवांची हानी करणे टाळून त्यांच्या संरक्षणासाठी सतत प्रयत्नशील राहायला हवे म्हणून पौष्टिक व ज्या आहारामुळे कुठल्याही जीवाची हानी होणार नाही असा आहार घ्यायला हवा. आहार साधन असून, साध्य नाही. शाकाहार कुठल्याही व्यक्तीच्या जगण्याची शैली निर्धारित करतो. असा आहार मन व शरीराला मजबूत करतो. शाकाहारामुळे फक्त आपले विचारच शुद्ध न होता आपल्यात दया, क्षमा सारख्या भावनांचा विकास होतो. आपण जगण्यासाठी जेवण करतो, जेवणासाठी जगत नाही याचा विसर पडायला नको. म्हणूनच आहार एक साधन असून साध्य नाही.

हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर - ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
संपादक - रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५
(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी)
RNI No.: - MAHMAR/2017/72894